सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २७ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## शेतमालाच्या बाजारमूल्य निश्चितीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेजिंग डेस्कची स्थापना करणार, शेतकऱ्यांना मिळणार अधिक फायदा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य बाजारमूल्य मिळावे यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे येथे कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू करण्यात आलाय. टप्प्याटप्प्याने इतर पिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी त्यांच्या उत्पादनांच्या भविष्यातील किमतीतील चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. 'सेबी'चे नियंत्रण असलेल्या एनसीडीईएक्स (NCDEX) संस्थेच्या कमोडिटी मार्केट्स आणि संशोधन संस्थेने या प्रकल्पासाठी सहकार्य केलं असून, हा उपक्रम कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या प्रकल्पाची माहिती देताना सांगितले.



कृषी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्याचा राज्याच्या सकल उत्पन्नात १२ टक्के वाटा आहे. मात्र राज्यातील शेतीमध्ये पिकांचे उत्पादन अजूनही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. शेतीमध्ये पेरणी करूनही निश्चित क्षमतेनुसार उत्पादन आणि उत्पादित मालाला योग्य भाव मिळण्याबाबत शेतकऱ्यांना नेहमीच चिंता असते. शेतकरी पिकांचे उत्पन्न घेतो तरी मालाची किंमत ठरवणारा नसतो ही अनिश्चितता कमी करण्यासाठी शासनाकडूनदेखील विविध शासकीय धोरणे, सुधारित शेती पद्धती, विविध पीक विमा योजनांचे पाठबळ शेतकऱ्यांना दिले जाते. शेतीतून किमान उत्पन्न मिळवण्यासाठी शाश्वत उपायोजना करणे गरजेचे आहे. हेच लक्षात घेऊन वैयक्तिक शेतकरी, मर्यादित संसाधने लक्षात घेऊन शेतकऱ्यांना बाजारपेठेतील ज्ञान मिळावे, यासाठी शासनाने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचललंय. शेतकऱ्यांना बाजारातील अनिश्चिततेपासून वाचविण्यासाठी एककेंद्रित समर्पित कृषी हेजिंग डेस्कची स्थापना पुणे येथे करण्यात आली आहे.

**शेतकऱ्यांना याबाबत अधिक माहिती कुठे मिळेल**

शेतकरी उत्पादक संघटना (FPO) आणि क्लस्टर आधारित व्यवसाय संघटना (CBBOs) व शेतकरी यांना हेजिंग डेस्कबद्दल माहिती आणि संपर्कासाठी पुढील क्रमांक आहेत. हेजिंग डेस्क (Hedging Desk) साठी संपर्क प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - कृषी (स्मार्ट प्रकल्प) कार्यालय पुणे येथील संपर्क पुढीलप्रमाणे आहेत. निविष्ठा आणि गुणनियंत्रण तज्ज्ञ बाबासाहेब जेजुरकर, मो. ९४०५००२८००, पीक विश्लेषक डॉ. ब्रह्मानंद देशमुख मो. ९५६१४२१५०९, एसीडीईएक्स आणि एनआयसीआर येथे (NCDEX - NICR) चे संपर्क- जोखीम निवारण आणि हेजिंग डेस्कचे प्रमुख सल्लागार नीरज शुक्ला मो. ९३२३६१४६२६, रिस्क ॲनालिस्ट - जोखीम निवारण व हेजिंग डेस्क गौतम आठवले मो. ९४२०४१९४७०, निधी मिश्रा मो. ९०२९३९१८०६ संपर्कासाठी ई मेल आयडी- hedgingdesk.smartgmail.com आहे येथे हेजिंग डेस्कच्या अनुषंगाने याबद्दल अधिक माहिती मिळेल. एनसीडीईएक्स संस्थेच्या https://www.ncdex.com या संकेतस्थळावर about us मध्ये हेजिंग डेस्कबद्दल आणि प्रशिक्षणाविषयी, हेंजिंग डेस्क जनजागृतीपर माहिती देखील उपलब्ध आहे.

## अलकनंदा नदीत कोसळली बस

### महाराष्ट्राचा भाविक बेपत्ता, तब्बल ७ जणांचा अद्यापही शोध लागेना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७देहरादून :**

अलकनंदा नदीत टेम्पो ट्रॅव्हलर कोसळून २४ तास उलटून गेले आहेत. या बसमधील ७ भाविक अद्यापही बेपत्ता असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे. या बेपत्ता भाविकांमध्ये एका महाराष्ट्राच्या भाविकाचाही समावेश आहे.

गुरुवारी सकाळी ही घटना घडल्यानंतर आता २४ तास उलटले आहेत. बेपत्ता भाविकांचा सैन्य दलाचे जवान, आयटीबीपी, एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि स्थानिक पोलिसांच्या पथकांनी शोधमोहीम सुरू केली आहे.गुरुवारी उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग इथं अलकनंदा नदीत टेम्पो ट्रॅव्हलर कोसळून अपघातात २ भाविकांचा मृत्यू झाला. या बस अपघातात बेपत्ता झालेल्या ९ यात्रेकरूंचा अद्याप शोध लागलेला नाही. धक्कादायक बाब म्हणजे अपघातग्रस्त बस अद्यापही आढळून आली नाही. शुक्रवारी झालेल्या या अपघाताला २४ तासांपेक्षा अधिक काळ झाला आहे. मात्र अद्यापही बेपत्ता झालेल्या ७ भाविकांचा शोध लागलेला नाही. बेपत्ता भाविकांचा युद्धपातळीवर शोध सुरू आहे.

गुरुवारी सकाळी हा अपघात घडल्यानंतर सैन्य दलाचे जवान, आयटीबीपी, एनडीआरएफ, एसडीआरएफ, स्थानिक पोलीस आणि नागरिक बस आणि त्यातील ७ बेपत्ता भाविकांचा शोध घेत आहेत. मात्र २४ तासांपेक्षा अधिक काळ उलटूनही त्यांना कोणी शोधू शकलेलं नाही. बसचा ढिगाराही नदीत सापडलेला नाही.

## राज- उद्धव ठाकरेंचा मुंबईत ५ जुलैला एकत्र मोर्चा, हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधु एकटवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

राज्य सरकारने केलेल्या हिंदी सक्तीविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह उद्धव ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली आहे. पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात राज ठाकरे यांनी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. याचबाबत आता महत्त्वाची अपडेट समोर आली असून हिंदीविरोधात राज ठाकरे- उद्धव ठाकरे यांचा एकच विराट मोर्चा निघेल असे ट्वीट संजय राऊत यांनी केले आहे.



इयत्ता पहिलीपासून केलेल्या हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधुंनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारची कानउघडणी करत या निर्णयाविरोधात विराट मोर्चा काढणार असल्याचे स्पष्ट केले आहे. ५ जुलै रोजी राज ठाकरे यांचा मोर्चा निघणार आहे. त्यापाठोपाठ उद्धव ठाकरे यांचा ७ जुलै रोजी मोर्चा निघणार आहे. अशातच आता हे दोन्ही मोर्चे एकाच दिवशी निघणार असल्याची मोठी घोषणा संजय राऊत यांनी केले आहे.हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात ५ जुलै रोजी गिरगाव चौपाटीवरून मोठा मोर्चा निघणार आहे. या मोर्चामध्ये कोणताही पक्षाचा झेंडा नसेल, केवळ मराठी माणसाचा मोर्चा असेल, असे स्पष्ट करण्यात आलं आहे. चित्रपट सृष्टीतील कलाकार, खेळाडू, साहित्यिक, वकील यांना सहभागी व्हा, असं आवाहन देखील ठाकरे यांनी केलंय. महाराष्ट्राचं मराठीपण घालवण्याचा कट उध्वस्त करण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे, असं आवाहन त्यांनी केलंय.

## चौथीपर्यंत हिंदी लादणं योग्य नाही, पण देशात ५० टक्के लोक हिंदीत बोलतात - शरद पवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७पुणे**

महाराष्ट्रामध्ये शाळेत पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून सध्या राजकारण तापलं आहे. तसेच राज्य सरकारकडून हिंदी भाषेच्या होत असलेल्या सक्तीविरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येत मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांची हिंदी भाषेच्या सक्तीबाबतची प्रतिक्रिया समोर आली आहे. पहिलीपासून चौथीपर्यंत हिंदी भाषा अनिवार्य करणं योग्य नाही. मात्र देशात ५० टक्के लोक हिंदीत बोलतात, त्यामुळे हिंदीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे शरद पवार यांनी म्हटले आहे.



पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला होत असलेला विरोध आणि हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूंकडून करण्यात येणाऱ्या आंदोलनाबाबत विचारले असता शरद पवार म्हणाले की, या प्रश्नाला दोन बाजू आहेत. पहिली म्हणजे पहिलीपासून चौथीपर्यंत हिंदी भाषा अनिवार्य करणे योग्य नाही. पण पाचवीनंतर आपण हिंदी भाषा अनिवार्य करू शकतो. भारतात ५० टक्के नागरिक हिंदीत बोलतात. त्यामुळे हिंदीला दुर्लक्षित करून चालणार नाही, असेही शरद पवार यांनी सांगितले.

तर ठाकरे बंधूंकडून होणाऱ्या आंदोलनात सहभागी होण्याबाबत शरद पवार म्हणाले की, कोणीही सांगतो म्हणून आंदोलनात सहभागी होता येणार नाही. मुंबईत गेल्यावर मी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मांडलेली भूमिका ऐकून घेईन. महाराष्ट्राच्या हिताचा निर्णय असेल तर भूमिका घेतली जाईल, असेही शरद पवार यांनी स्पष्ट केलं आहे.

## १५० कोटींचं गिफ्ट अन् भूमरेंचा ड्रायव्हर अडचणीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ छत्रपती संभाजीनगर**

१५० कोटींच्या जागेमुळे खासदार संदीपान भूमरेंचा ड्रायव्हर आता अडचणीत आला आहे. शिवसेना शिंदे गटाचे छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भूमरे यांच्या ड्रायव्हरला हैद्राबादच्या सालारजंग कुटुंबाकडून १५० कोटींची जमीन गिफ्ट मिळाली आहे. एवढ्या मोठ्या रकमेची जागा भूमरेंच्या ड्रायव्हरला गिफ्ट कशी मिळाली याची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू आहे.




संदीपान भूमरेंच्या ड्रायव्हरची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगरमधल्या दाऊदपुरा परिसरातल्या १५० कोटींच्या ३ ऐकर जागेवरून ही चौकशी करण्यात येत आहे. ही जागा मूळ हैद्राबादच्या सालारजंग कुटुंबाची होती. सालारजंग कुटुंबं हे हैद्राबादच्या निजामाच्या सेवेत होतं. या कुटुंबाची १५० कोटींची जागा भूमरेंच्या ड्रायव्हरला गिफ्ट म्हणून देण्यात आली आहे. जावेद शेख असं या ड्रायव्हरचं नाव असून तो १२ ते १३ वर्षांपासून भूमरेंच्या सेवेत आहे. साधारण ड्रायव्हर असलेल्या व्यक्तीला एवढ्या मोठ्या रकमेची जागा गिफ्ट कशी मिळाली असा संशय आता निर्माण झाला आहे. त्यामुळे त्याची चौकशी करण्यात येत आहे.याप्रकरणी खासदार भुमरे यांनी ड्रायव्हरच्या व्यवहाराशी संबंध नाही, असं स्पष्ट केलं आहे. एक साधा ड्रायव्हर, ज्याला पंचवीस हजार पगा असेल. त्याला सालारजंग एवढी प्रॉपर्टी ड्रायव्हरला भेट देत असतील, तर चौकशी व्हायला हवी असं म्हटलेलं आहे. याप्रकरणी खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे आणि चालक जावेद रसूल यांची आर्थिक गुन्हे शाखा चौकशी करत आहे.

## अमरावती पोलिसांचा 'मास्टरप्लॅन', अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांना ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी दिला समज

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २७ अमरावती**

दारू, सिगारेटपासून मुलांना दूर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करणाऱ्या पालकांपुढे आता अमली पदार्थांच्या विळख्यापासून दूर ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. हा विळखा शाळा, महाविद्यालयांपासून सार्वजनिक ठिकाणापर्यंत जोरकसपणे बसत आहे. या व्यसनांचे केवळ शारिरिक नाही तर मानसिक पातळीवर होणारे परिणामही दीर्घकालीन, गंभीर आहेत. या पदार्थांची तस्करी रोखण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.



अमली पदार्थांच्या तस्करीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणे अशा गोष्टी करीत गुन्हेगारीत गुंतणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस जिल्ह्यात वाढत आहे. त्याला आळा घालण्यासाठी आणि संबंधितांना ताळ्यावर आणण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी कंबर कसली असून, भविष्यात गुन्हेगारीचा मार्ग चोखाळणाऱ्या आरोपींची 'कुंडली' तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

याशिवाय अनेक आरोपींना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांना समज देण्यावरही भर देण्यात येत आहे. गेल्या दहा वर्षांत अंमली पदार्थांच्या तस्करीत सहभाग असणाऱ्यांची एक यादी तयार करण्यात आली. त्यातून जिल्ह्यातील ५७ आरोपींची माहिती समोर आली. या सर्व आरोपींना प्रतिबंधक कारवाईसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले. या अवैध व्यवसायापासून दूर राहण्याचे आणि पुन्हा जर अशा व्यवसायात समावेश असल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कायदेशीर करण्यात येईल, अशी समज ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी यावेळी दिली.

## मेळघाटातील आमझरीचा 'कॉफी मळा' रोजगार फुलवणार, ५ हजार नव्या रोपांची लागवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

संपूर्ण महाराष्ट्रात कॉफीच्या उत्पादनाचं एकमेव केंद्र मेळघाटातील चिखलदरा इथं आहे. इथली ब्लॅक कॉफी पिण्यासाठी चवदार तर आहेच, शिवाय या कॉफीपासून बनवलेली सौंदर्य प्रसाधनंदेखील अतिशय उत्कृष्ट दर्जाची आहेत. चिखलदरा आणि लगतच्या गावातील महिला बचत गटांना चांगला रोजगार मिळावा, या उद्देशानं महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्थेनं विशेष पुढाकार घेतला आहे. आमझरी इथं वन विभागाच्या वतीनं कॉफीची ५ हजार वृक्षांची बाग फुलवली जात आहे.




मेळघाटातील कॉफी वाढावी आणि या भागातील आदिवासी बांधवांना रोजगार मिळावा, यासाठी केंद्र सरकारकडून विचार केला जात आहे. याच अनुषंगानं काही दिवसांपूर्वी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाशी संलग्नित असणाऱ्या वर्धा इथल्या महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्थेच्यावतीनं वर्षभरापासून मेळघाटातील कॉफीवर विविध प्रयोग करण्यात आले आहेत. या संस्थेच्या प्रतिनिधी डॉ. शीतल शर्मा आणि शामली जमाणे यांनी नुकतीच चिखलदऱ्यातील कॉफीच्या बागांची माहिती घेतली. यावेळी त्यांनी महिला बचत गटातील महिलांशी संवाद साधला. तसेच, कॉफीपासून तयार होणारं साबण, हॅन्डवॉश, फेस वॉश, लीपबाम, फेस पॅक, शॅम्पू, कंडिशनर, स्क्रबिंग मास्क अशा विविध २० वास्तूंची माहितीही महिलांना दिली.

चिखलदरा वन विभागाच्या उद्यानात मोठ्या प्रमाणात कॉफीची झाडं आहेत. काही आदिवासी बांधव कॉफी उत्पादनाकडं वळले असतानाच, वन विभागानं देखील पुढाकार घेत आमझरीत एकूण ५ हजार कॉफीची झाडं लावली आहेत. आता वर्षभरात ही सर्व झाडं मोठी झाली की, आमझरी परिसरात मोठ्या प्रमाणात कॉफीचं उत्पादन वाढेल.

## राजकारणात मला फक्त आशिष शेलार माहिती, इतर कोणाशीही संबंध नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

राजकारणात मला फक्त आशिष शेलार माहिती, इतर कोणाशीही संबंध नसल्याचं विधान सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी केलंय. सध्या राज्यात हिंदी भाषा सक्तीच्या मुद्द्यावरुन घमासान सुरु असतानाच आशा भोसले यांनी हे विधान केलंय. काही दिवसांपूर्वीच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आशा भोसले राज ठाकरेंनी आयोजित केलेल्या मुंबईतील शिवाजी पार्क मैदानात एका कार्यक्रमात दिसून आल्या होत्या. ठाकरे घराण्याशी मंगेशकर कुटुंबियांचे संबंध सर्वांना माहितच आहे. राज ठाकरेंच्या मोर्चाच्या घोषणेनंतर भोसले यांनी केलेलं हे विधान चांगलंच चर्चेत आलंय.



राज ठाकरे यांनी हिंदी भाषेच्या सक्तीच्या मुद्द्यावरुन येत्या ५ जुलै मोर्चाची घोषणा केल्यानंतर माध्यमांकडून हिंदी भाषेच्या मुद्द्यावर आशा भोसले यांना सवाल करण्यात आला. त्यावर बोलताना आशा भोसले म्हणाल्या, राजकारणाशी माझा काहीही संबंध नाही. राजकारणातील आशिष शेलार मला माहित आहेत, बाकी कोणाशीही माझा संबंध नाही, असं विधान आशा भोसले यांनी केलंय.

संपादकीय ......

# खांद्यावर तिरंगा

विश्वाच्या या अनंत पसार्यात सतत असंख्य अद्भुत आणि चित्तथरारक घटना घडत असतात आणि त्यापैकी काही गोष्टींचा भूतलावरील जीवनावर परिणाम होत असतो. त्याचा शोध आणि संशोधनाच्या हेतूने जगातील अनेक देश अंतराळमोहिमा हाती घेत असतात. सोव्हिएत रशियाने १९५० च्या दशकात पहिले अवकाशयान सोडल्यानंतर हादरलेल्या अमेरिकेने प्रचंड मोठा अंतराळ प्रकल्प हाती घेतला. १९६० चे दशक संपायच्या आत अमेरिकन माणूस चंद्रावर उतरेल, अशी घोषणा तेव्हाचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनी केली. त्यानुसार १९६९ मध्ये नील आर्मस्ट्राँग चंद्रावर उतरले. त्यानंतर गेल्या अनेक वर्षांत इतकी अवकाशयाने आणि उपग्रह हवेत सोडले गेले आहेत की, त्यांची मोजदादच करता येणार नाही. संदेशवहन, दळणवळण, माहिती प्रक्षेपण या सर्व क्षेत्रांत प्रगती करायची असेल, तर अंतराळमोहिमा चालूच ठेवाव्या लागतील. या क्षमता संपादन केल्याशिवाय भारत खर्या अर्थाने समर्थ आणि समृद्ध होऊ शकणार नाही, याचे भान ठेवत ही योजना आखली गेली.

या पार्श्वभूमीवर, भारताच्या हवाई दलातील ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे रवाना झाले. भारताच्या राकेश शर्मा यांच्यानंतर ४१ वर्षांनी शुक्ला यांनी अवकाशात झेप घेतली, त्यामुळे साहजिकच अवघ्या भारतात याचे कौतुकमिश्रित स्वागत झाले. पृथ्वीपासून २०० किलोमीटर अंतरावरील कक्षेत 'ड्रॅगन' अवकाशकुपी नेल्यानंतर, ॲक्सिओम-४ मोहिमेंतर्गत स्पेस एक्सचे फाल्कन-९ रॉकेट फ्लोरिडामधील केनेडी अवकाश केंद्रातून अंतराळवीरांना घेऊन उडाले. या मोहिमेचे सारथ्य कॅ. शुक्ला करत आहेत. हे अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे जातील आणि तेथे १४ दिवस राहतील. अंतराळवीरांनी त्यांच्या अवकाशकुपीचे नाव 'ग्रेस' असे जाहीर केले. मोहिमेत पोलंड आणि हंगेरीचे अंतराळवीरही आहेत. भारत १९८४ नंतर, पोलंड १९७८ नंतर आणि हंगेरी १९८० नंतर पुन्हा अवकाशात गेले आहेत. त्यामुळे या तिघांच्या दृष्टीने मोहिमेचे महत्त्व आगळेवेगळे आहे. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात जाणारे कॅ. शुक्ला हे पहिले भारतीय अंतराळवीर असतील. हा प्रवास १४० कोटी भारतीयांचा आहे, अशी सार्थ प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

यापूर्वी राकेश शर्मा १९८४ मध्ये सोव्हिएत संघाच्या सॅल्यूत-७ अवकाश केंद्रात होते. 'आम्ही सेकंदाला ७.५ किलोमीटर वेगाने पृथ्वीभोवती कक्षेत फिरत आहोत. माझ्या खांद्यावर असलेला भारताचा तिरंगा मला सांगतो की, तुम्ही एकटे नाही आहात. या प्रवासात सर्व भारतीय तुमच्यासोबत आहेत. हा केवळ माझ्या एकट्याच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील प्रवासाचा आरंभ नसून, भारताच्या महत्त्वाकांक्षी अवकाश कार्यक्रमाची सुरुवात आहे. देशातील सर्व नागरिकांनी या प्रवासाचा भाग व्हावे, ही माझी इच्छा आहे,' अशी भावना शुक्ला यांनी व्यक्त केली आहे. एखाद्या वैज्ञानिकात अथवा अंतराळवीरात राष्ट्रप्रेमाची भावना असली, तर त्याच्यात कशी जिगर आणि ऊर्जा येते, याचेच कॅ शुक्ला हे मूर्तिमंत उदाहरण. अंतराळातून आपला भारत 'सारे जहाँ से अच्छा' दिसतो, असे आपले पंतप्रधान व तमाम भारतीयांसह जगाला अभिमानाने सांगणार्या राकेश शर्मांनी २ ते ८ एप्रिल १९८१ दरम्यान टी-११ या रशियाच्या अंतरिक्षयानातून सात दिवस यशस्वी प्रवास केला आणि असा प्रवास करणारे ते पहिले भारतीय ठरले होते.

# सर्वच लोक घरी बीपी मोजताना करतात 'ही' चूक, अचूक रीडिंग हवे असेल तर 'एवढं' करा...




**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्यापैकी बऱ्याचजणांना हाय ब्लड प्रेशरचा त्रास असतो. ब्लड प्रेशर असल्यास ते अचानक कमी झाले किंवा किंचित वाढले तरी त्याचा त्रास होऊ शकतो. आजच्या काळात ब्लड प्रेशर कायम नियंत्रणात ठेवणे आरोग्याच्या दृष्टीने फारच गरजेचे असते. जर रक्तदाब नियंत्रणात ठेवला गेला नाही, तर हृदयविकार, स्ट्रोक आणि इतर गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे रक्तदाबावर वेळोवेळी लक्ष ठेवणे खूप आवश्यक असते. आजकाल प्रत्येकजण आपल्या घरात एक ब्लड प्रेशरचे मशीन कायम ठेवतात, वारंवार डॉक्टरकडे जाण्याऐवजी किंवा अचानक गरज लागेल तेव्हा आपण याचा वापर करु शकतो. बहुतेकजण बीपी मोजण्यासाठी डॉक्टरकडे जाण्याऐवजी घरीच मशीनवर बीपी तपासणे पसंत करतात. परंतु घरच्याघरीच बीपी मोजताना काही लहानसहान चुका केल्या जातात, ज्यामुळे रक्तदाबाचे मोजमाप बरोबर येत नाही. यामुळे चुकीचे निदान होऊ शकते आणि आरोग्याच्या तक्रारी वाढू शकतात. अशा परिस्थितीत, रक्तदाब मोजण्याची योग्य पद्धत कोणती आहे आणि बीपी मोजताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात याबद्दल तज्ज्ञांकडून अधिक माहिती समजून घेऊयात. -खखचड ऋषिकेशमध्ये मेडिकल हेल्थ वर्कर म्हणून कार्यरत असलेले अंकित शर्मा यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर एक माहितीपूर्ण



व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडीओत त्यांनी घरीच बीपी मशीनवर बीपी मोजताना कोणत्या चुका टाळाव्यात आणि अचूक रिडींग कसे घ्यावे हे सविस्तर सांगितले आहे.

**१. हाताची योग्य पोझिशन कशी असावी ?**- अंकित शर्मा यांच्या मते, बीपी मोजताना रुग्णाचा हात पूर्णपणे सरळ आणि स्थिर असायला हवा. हाताला योग्य आधार मिळावा म्हणून तो टेबलसारख्या सपाट पृष्ठभागावर ठेवावा. याचबरोबर, हात खूप वर नको आणि खूप खाली देखील नको. हाताची पातळी ही हृदयाच्या समांतर लेव्हमध्ये असायला हवी. हृदयाच्या वर किंवा खाली हात असल्यास रीडिंग चुकीचे येऊ शकते. सरळ आणि योग्य पोझिशनमध्ये हात ठेवल्यानेच बीपीचे मोजमाप अचूक मिळते.

**२. बीपी कफ कुठे आणि कसा बांधावा?**- अंकित शर्मा यांच्या मते, बीपी मोजण्यासाठी कफ हातावर बांधण्याची सुद्धा एक योग्य पद्धत असते. बीपीकफ हा हातांच्या कोपराच्या सांध्यापासून सुमारे ३ बोटं (अंगठ्याच्या रूंदीने) वर बांधावा. कफचा ट्यूब (पाइप) हा हाताच्या समोरच्या बाजूला, म्हणजेच कोपराच्या थोडाच वर असावा. कफ खूप घट्ट किंवा खूप सैल नको, एक बोट सहज जाईल इतका मोकळा असावा. कफ चुकीच्या ठिकाणी किंवा चुकीच्या पद्धतीने लावल्यास बीपी रीडिंग अचूक येत नाही, त्यामुळे हे योग्य रिडींग येण्यासाठी हे व्यवस्थित करणे आवश्यकच असते.

**३. बीपी कफ किती घट्ट बांधावा?** - अंकित शर्मा सांगतात की वय आणि शरीराच्या आकारानुसार बीपी कफचा साइज वेगवेगळा असतो. लहान मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी वेगवेगळ्या साइजचे कफ बाजारात उपलब्ध असतात. जर तुम्ही एखाद्या प्रौढ व्यक्तीचे बीपी मोजत असाल, तर त्यासाठी योग्य साइजचा कफ वापरणे अत्यंत महत्त्वाचे आहे. चुकीच्या साइजचा किंवा चुकीच्या पद्धतीने बांधलेला कफ बीपी रीडिंग अचूक देऊ शकत नाही, त्यामुळे काळजीपूर्वक आणि योग्य पद्धतीनेच बीपीकफ बांधावा.धावणे, चालणे किंवा कोणत्याही प्रकारचा एक्सरसाइज केल्यानंतर ताबडतोब बीपी मोजू नये. अशावेळी बीपी मोजल्यास रीडिंग जास्त (हाय) येऊ शकते, जे चुकीचं असू शकतं. त्यामुळे किमान ३० मिनिटे विश्रांती घेतल्यानंतरच बीपी मोजावे. अशा काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवून तुम्ही घरीच योग्य पद्धतीने, अचूक बीपी मोजू शकता आणि आपले ब्लड प्रेशर नियंत्रणात ठेवू शकता.

# डॉ. अविनाश आवलगावकर सोमवारी आकाशवाणीवर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७अमरावती :**



५महाराष्ट्र मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूरचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांची मुलाखत सोमवार दि. ३० जून रोजी सकाळी १० वाजता अमरावती आकाशवाणीवरून प्रसारित होणार आहे. विविधा या मालिकेत 'नमस्कार अमरावती' या लोकप्रिय कार्यक्रमातून डॉ. आवलगावकर श्रोत्यांशी संवाद साधतील. आकाशवाणीचे वरिष्ठ उद्घोषक संजय ठाकरे त्यांच्याशी संवाद साधतील. महाराष्ट्र मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना, कार्य, अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया अशा विविध विषयांवर ते मुलाखतीतून प्रकाश टाकतील. निर्मिती साह्य नितीन भट यांचे असून या मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन आकाशवाणी अमरावतीचे कार्यक्रम प्रमुख भय्या टेकाम, वरिष्ठ उद्घोषक संजय ठाकरे आणि कार्यक्रम अधिकारी विनोद गवळी यांनी केले आहे.

# लाखो रुपयांची वीजचोरी उघड तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती** - वीज मिटर तपासणी दरम्यानलाखो रुपयांची वीज चोरी केल्याचे उघडकीस येताच बडनेरा पोलिसांनी श्रीकांत पंजाबराव तळेगावकर (वय ४९) यांच्या तक्रारीवरून तिघांविरुध्द गुन्हे दाखल केले. पांडुरंग रामचंद्र रायबोले, प्रेमप्रकाश किशनराम बिष्णोई (वय ३५) आणि योगेश वामनराव काटोलकर (वय ३६ तिन्ही रा. भातकुली) या तिघांविरूध्द बडनेरा पोलिसानी गुन्हा दाखल केला आहे. विद्युत महावितरण विभागाचे कर्मचारी भातकुली गावात वीज मिटर तपासणीची मोहीम राबवित होते. दरम्यान त्यांनी पांडुरंग रायबोले आणि प्रेमप्रकाश बिष्णोई यांच्या घरातील वीज मिटरची पाहणी केली असता दोघांनी ४ लाख ४ हजार ९४० रुपयांची वीज चोरी केल्याचे उघड झाले. तसेच काटोलकर यांनी २ लाख ६९ हजार ९३० रुपयांची वीज चोरी केल्याचे स्पष्ट होताच त्यांना संबंधित अधिकाऱ्यांनी तळजोडीअंती काही रक्कम भरण्याची मुभा दिली. परंतु तिघांनी अद्यापही तडजोड रक्कम न भरल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.-

# सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेण्यासाठी 'या' पोर्टलवरून अर्ज घेण्यास सुरवात; कसा कराल अर्ज?

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

राज्याच्या सर्वांगीण विकासात कृषि क्षेत्राचे अनन्य साधारण महत्व आहे. कोणत्याही पिकाचे गुणवत्तापुर्ण व दर्जेदार उत्पादन घ्यायचे असेल तर पाणी हा पिक उत्पादनातील महत्वाचा निर्णायक घटक आहे.

**योजनेचा उद्देश**

- पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविणे.

- सुक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे

**अनुदान मर्यादा**- अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५%

- इतर शेतकऱ्यांना ४५% अनुदानाचे निकष असून क्षेत्राची मर्यादा ५ हेक्टर आहे.

**योजनेची व्याप्ती**

- सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

**लाभ क्षेत्र मर्यादा**- सुक्ष्म सिंचन संच घटकाचे आयुर्मान ७ वर्ष करण्यात आले असुन ज्या लाभधारकाने ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत सुक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेतला आहे, अशा लाभधारकास ७ वर्षानंतर पुन्हा सुक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेता येईल. एखाद्या शेतकऱ्यांने सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत पोर्टेबल स्प्रिंकलर (चल तुषार संच) या घटकाचा लाभ घेतला असल्यास सदर शेतकऱ्यांस तीन वर्षानंतर त्याच क्षेत्रावर ठिबक संचाचा लाभ घेता येईल. ठिबक संचास एष-षशलींळींश ऊळषषशीशपींळरश्र डींलीळवू नुसार अनुदान अदा करण्यात येईल.

**लाभार्थी पात्रता**

शेतकऱ्यांच्या नावे मालकी हक्काचा ७/१२ व ८-अ उतारा असावा.

सूक्ष्म सिंचन घटकाचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असावी.

अर्ज करणेपासुन अनुदान अदायगी पर्यंत महाडीबीटी पोर्टलवरील प्रक्रीया खालीलप्रमाणे

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या सर्व योजनांसाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (ऋीशी खऊ) अनिवार्य करण्यात आले आहे.

शेतकरी ओळख क्रमांक आणि त्याच्याशी संलग्न माहिती कृषी विभागामार्फत वापरत असलेल्या महाडीबीटी प्रणालीशी -झख द्वारे -सीळडींरलज्ञ या प्रणालीशी जोडण्यात आलेली आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ७/१२ व ८-अ ही कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

शासनाने सन २०२५-२६ पासून महाडीबीटी पोर्टलवर प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्याचा निर्णय २१ मे २०२५ रोजीपासून घेतलेला आहे.

सद्यस्थितीत योजने अंतर्गत ६५,५१५ लाभार्थ्यांची निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राध्यान्य (ऋउऋड) या तत्वावर करण्यात आलेली आहे.

**अर्ज शुल्क**- अर्ज सादर करतेवेळी शेतकऱ्यांनी रु. २०/- शुल्क व जी.एस.टी रु. ३.६०/- मिळून एकूण रु. २३.६०/- शुल्क ऑनलाइन भरावयाचे आहे.निवड झालेल्या शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रे अपलोड करावी.

- सामाईक क्षेत्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांने इतर खातेदारांचे सहमती पत्र सादर करणे बंधनकारक असुन ते साध्या कागदावर घेण्यात यावे.

- अज्ञान पालक (अपाक) खातेदाराचा वयाचा दाखला व पालकाचे घोषणापत्र.

- लाभार्थी/संस्था यांना शेतजमीन भाडेतत्वावर घेऊन सुक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास, मालकी हक्क असलेला ७/१२, ८-अ आणि लाभार्थ्याने अर्ज मंजुर झाल्याच्या दिनांकापासुन सात वर्षासाठी शेतमालकासोबत केलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.

**पुर्वसंमती प्रदान करणे**

छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना तालुका कृषि अधिकारी एकत्रित संगणकीय प्रणालीद्वारे पूर्वसंमती प्रदान करतात.

**संच खरेदी करुन देयक अपलोड करणे**-पुर्व संमती प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांस त्यांच्या पसंतीच्या उत्पादकांकडून किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या वितरक किंवा विक्रेत्यांकडून ३० दिवसाच्या आत सुक्ष्म सिंचन संच बसविणे आवश्यक आहे.

संच खरेदी केल्यानंतर महाडीबीटी पोर्टलवर सादर करावयाची कागदपत्रे

- शेतकऱ्याचे हमीपत्र.

- देयकाची मुळ प्रत (टॅक्स इन्व्हाईस)

- कंपनी प्रतिनिधीने तयार केलेला सुक्ष्म सिंचन संच आराखडा व प्रमाणपत्र.

**मोका तपासणी व देयक छाननी**

कृषि पर्यवेक्षक हे देयक छाणणी करतात. तसेच प्रत्यक्ष क्षेत्रिय मोका तपासणी करुन पोर्टलवर अहवालाची नोंद घेऊन छाननी अंती पात्र प्रस्तावास शिफारस करतात.

**अनुदान परीगणना व मंजुरी देणे**- देयकाची रक्कम जीएसटी रक्कम वगळुन, मोका तपासणी अहवालानुसार निश्चित झालेली रक्कम आणि मार्गदर्शक सुचनेतील मापदंडाप्रमाणे निश्चित झालेली रक्कम यापैकी सर्वात कमी आलेल्या रकमेनुसार अनुदान परिगणना करुन मंजुरीसह तालुका कृषी अधिकारी यांच्या स्तरावरून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या स्तरावर शिफारशीस सादर केली जाते.

**ऑनलाइन अर्ज कसा करावा?**

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी र्हीींिः// ारहरवलीं.ारहरीरीहींर.सीीं.ळप/ ऋाशी/-सीळडेसळप या संकेतस्थळास अवश्य भेट द्या. तसेच योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषि विभागाच्या नजीकच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# तीन फेऱ्यांमध्ये मिळालेल्या पसंतीच्या कॉलेजमध्येच घ्यावा लागेल प्रवेश अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेच्या नियमात बदल : तीनऐवजी होणार चार प्रवेश फेऱ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती -**

राज्यात सीईटीचे निकाल जाहीर झाल्यानंतरही अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली नाही. दरम्यान तंत्रशिक्षण विभागाने प्रवेश प्रक्रियेत काही बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये मिळालेले अनुक्रमे एक, तीन किंवा सहा पैकी कोणतेही पसंतीच्या महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य असेल. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील बदलांबाबत अधिसूचना जारी केली आहे. वरील नियम राज्यभरातील विनाअनुदानित, खासगी व्यावसायिक संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी लागू राहतील. यावेळी प्रक्रियेत तीन ऐवजी चार कॅप राउंड होतील. चौथ्या फेरीनंतर कोणतीही सुधारणा होणार नाही. दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या जागांची माहिती सीईटी सेलच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. तसेच, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या फेरीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना ऑप्शन फॉर्म भरण्याची किंवा मागील फेरीत भरलेले ऑप्शन बदलण्याची संधी मिळेल. जर अर्जाच्या वेळी विद्यार्थ्याने पसंत केलेल्या महाविद्यालयाच्या पसंतीनुसार पहिल्या यादीतील पहिले महाविद्यालय, दुसऱ्या यादीतील पहिले तीन महाविद्यालय आणि तिसऱ्या यादीतील पहिल्या ६ महाविद्यालयात सीट मिळाली, तर प्रवेश निश्चित मानला जाईल.हे विद्यार्थी पुढील फेरीसाठी पात्र राहणार नाहीत.



म्हणजेच या विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणे अनिवार्य असेल. याशिवाय, चार फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरच संस्थात्मक प्रवेश फेऱ्या घेतल्या जातील. त्यांची गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. जर या फेरीत संस्थेने अर्ज नाकारला तर विद्यार्थी सीईटी सेलच्या वेबसाइटवर अर्ज करू शकतील.

## कॉलेज कोट्याच्या प्रवेशासाठी भरावे लागेल तीनपट शुल्क

कॉलेज कोट्यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून संस्था निर्धारित शुल्काच्या तीन पट अधिक शुल्क आकारू शकते. तर, अनिवासी भारतीय कोट्यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पाच पट अधिक शुल्क आकारले जाऊ शकते. चारही फेऱ्याची भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थात्मक कोट्याची घोषणा केली जाईल. विद्यार्थी चारही फेऱ्यांमध्ये संस्थात्मक कोट्याच्या जागांसाठी अर्ज करू शकतात. संस्थांना या फेरीची प्रक्रिया देखील गुणवत्तेच्या आधारे पूर्ण करावी लागेल. संस्थांना वेबसाइटवर गुणवत्ता यादी प्रकाशित करणे बंधनकारक असेल.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शुक्रवार दि. २७ जून २०२५

शहर/ग्रामिण


# वीज शॉक लागून मृत्यू झाल्यास वीज अधिकाऱ्यावर फौजदारी दाखल करणार

## आ. रवि राणांचा कडक इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती,**

अमरावती जिल्ह्यातील वीज समस्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत शहरातील वीज समस्यांवर चर्चा करण्यात आली. डीपीओपन, असून तारा लोंबकळत आहेत. वीज शॉक लागून मृत्यू झालयास अधिकाऱ्यांवर फौजदारी दाखल करण्याचा इशारा आ रवी राणा यांनी दिला.या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, प्रधानमंत्री कुसुम सौर कृषी योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, सूर्य घर योजना तसेच

आरडीएसएस योजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस विद्युत विभागाचे मुख्य अभियंता अशोक साळुंखे, अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, कार्यकारी अभियंते प्रदीप अंधारे, राजेश घाटोळे, उपअभियंते व शाखा अभियंते तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत देण्यात आलेली महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे: मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेअंतर्गत, १३८५५९ पात्र कृषी ग्राहकांसाठी २९४.९१ कोटी इतकी वीज देयक सवलत वर्ष २०२४-२५ साठी मंजूर करण्यात आली आहे. प्रधानमंत्री कुसुम सौर कृषी योजना ही केंद्र सरकारच्या सहभागाने राबवली जात असून, ओसवाल कंत्राटदार ाकडे ६०० युनिट्सचा कोटा उपलब्ध आहे. ग्रामपंचायतींना योजनेबाबत माहिती देण्याचे तसेच जनजागृती मोहीम राबविण्याचे निर्देश आमदार रवी राणा यांनी दिले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीयोजने अंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्रे - ४०, अतिरिक्त रोहित्र - २६, व उपकेंद्र क्षमतेत वाढ - १६ अशा १०४५.२८ कोटींच्या डीपीआरसाठी प्रस्ताव सादर करण्यात आले असून, यासाठी मुख्यमंत्र्यांकडे थेट पाठपुरावा करण्याचा निर्णय आमदार राणा यांनी घेतला आहे. सूर्य घर योजना अंतर्गत १,०८,००० लाभार्थ्यांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती-जमातीतील लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. लो व्होल्टेज व भारनियमन समस्या सोडवण्यासाठी नवीन उपकेंद्रांची उभारणी, क्षमता वाढ, तसेच वीज वितरण संरचनेचे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. चांदुरी व पिपरी गावांना इतर उपकेंद्रांशी जोडण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.


# चिखलदारा पर्यटन स्थळी ये जा करण्यासाठी पर्यायी मार्गाचा वापर करा- जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती-** चिखलदरा हे एक निसर्गरम्य पर्यटन स्थळ असून येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होत असते. प्रामुख्याने शनिवार व रविवार मोठ्या प्रमाणात पर्यटक वाहनांनी चिखलदरा येथे येत असतात. यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता असते. त्याअनुषंगाने पर्यटकांनी चिखलदार पर्यटन स्थळी जाण्यायेण्यासाठी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम व मोटार वाहन कायदा अन्वये २८ सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या कालावधीतील दर आठवडयाचे शनिवार व रविवार या दिवशी चिखलदरा येथे येण्यासाठी परतवाडा ते चिखलदरा या मार्गावरील वाहतुक ही परतवाडा वरून धामणगाव मार्गे चिखलदरा या मार्गाने तर चिखलदरा येथून जाण्यासाठी चिखलदरा ते परतवाडा या मार्गावरील वाहतुक घटांग, परतवाडा या प्रकारे एक मार्गी (वन-वे) वळविण्याचे आदेश श्री. येरेकर यांनी निर्गमित केलेले आहे. चिखलदार पर्यटन स्थळी जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या पावसाळ्यातील तीन महिन्यात निसर्गाचा आनंद घेण्यासाठी राज्यभरातून मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. प्रामुख्याने आठवड्याच्या शेवटी शनिवार व रविवार या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक चारचाकी, दुचाकी, ऑटो, ट्रॅव्हलर्स, बस अशा वाहनांनी चिखलदरा येथे येत असतात. प्रामुख्याने पर्यटक हे चिखलदरा ते परतवाडा या मार्गाचा वापर करतात. हा रस्ता अरूंद असून नागमोडी वळणाचा आहे. चिखलदरा हे मेळघाट व्याघ्र प्रकल्पात येत असून जंगलातील वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात संचार करीत असल्याने रस्त्यावर येतात. त्यामुळे वन्यप्राण्यांसोबतही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने परतवाडा ते चिखलदरा मार्गावरील येणारी व जाणारी वाहतुक एक मार्गी (वन-वे) वळविण्यात आली आहे. चिखलदारा पर्यटनस्थळी जाताना पर्यटकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पावसाच्या आगमनाने बळीराजा सुखावला
## कुठे रिमझिम,कुठे फवारा, तर कुठे धुव्वाधार



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७ अमरावती**

७जिल्ह्यात गुरुवारी सकाळपासूनच पावसाचे वातावरण असताना काही तालुक्यांत मात्र जोरदार पाऊस बरसला तर काही तालुक्यांत दिवसभर रिपरिप पाऊस सुरू होता. शेतीयोग्य पाऊस असल्याने मात्र शेतकरी चांगलाच सुखावला. तर दुसरीकडे मोर्शी तालुक्यातील काटपुर- ममदापूर येथे गुरुवारला दुपारी दोन वाजतापासून सतत तीन तास आलेल्या मुसळधार पावसामुळे नदीपत्रात ठेवलेली शेतक ऱ्याची मोटरसायकल पुरामध्ये वाहून गेली.जिल्ह्यात गत दोन दिवसांपासून मान्सूनने आगमन केले आहे.

जिल्ह्यात पावसाच्या प्रतिक्षेत आतापर्यंत ५० टक्केवर पेरण्या आटोपल्या आहेत तर ५० टक्के शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतिक्षा लागली आहे. अशातच गुरुवारी सकाळपासून ढगाळ वातावरण असताना असताना धामणगाव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, तिवसा, चांदूर रेल्वे, वरूड या तालुक्यांत चांगलाच पाऊस बरसला तर अचलपूर, मोर्शी, वरुड, चिखलदरा, धारणी, दर्यापुर, अंजनगाव सुर्जी, अमरावती आणि भातकुली तालुक्यांत मात्र सकाळपासूनच रिमझिम पाऊस सुरू होता.

वातावरणात थंडावा व सतत रिमझिम पाऊस सुरू असल्याने पिकांना पोषक वातावरण पाहावयास मिळाले. त्यामुळे शेतकरी चांगलाच सुखावला आहे. काही तालुक्यांत सकाळपासून तर काही तालुक्यांत दुपारपासून पावसाने सुरूवात केली. त्यामुळे आता पेरणीला गती येणार आहे.

# पहिल्याच पावसात रस्त्यावर पडले मोठे भगदाड
## मेळघाटातील सेमाडोह ते माखला रस्ता धोकादायक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मेळघाट:**

आदिवासी बहुल आणि अतिदुर्गम असा ओळख असलेला मेळघाट परिसर पुन्हा एकदा दुर्लक्षित प्रशासनाच्या आणि भ्रष्टाचारग्रस्त विकासकामांच्या विळख्यात सापडला आहे. सेमाडोह ते माखला रस्त्याच्या पहिल्याच पावसात पडलेल्या मोठ्या भगदाडामुळे संपूर्ण रस्ता धोकादायक झाला असून, या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे जीव मुठीत घेण्यासारखे ठरत आहे.माहितीनुसार, गेल्यावर्षी शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीतून सेमाडोह ते माखला या मार्गाचेडांबरीकरण करण्यात आले. मात्र संबंधित विभागातील अभियंते आणि कंत्राटदार कंपनी यांच्यातील संगनमतामुळे हे काम अत्यंत निकृष्टदजार्चे करण्यात आले. परिणामी, अजून पावसाळा नीट सुरूही न होता, पहिल्याच हलक्याशा सरींमध्ये रस्त्यावर मोठमोठाली भगदाडं पडली असून, काही ठिकाणी रस्ता पूर्णपणे वाहून गेला आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, अजून जोरदार पावसाला सुरुवातही झालेली नाही. पुढे पावसाचा जोर वाढल्यास हा रस्ता पूर्णपणे वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अपुऱ्या



बांधकामामुळे वाहनधारकांना व प्रवाशांना मोठा धोका निर्माण झाला आहे. अपघातांची शक्यता प्रबळ असून, कुठल्याही क्षणी जीवितहानी होऊ शकते. यापार्श्वभूमीवर, संबंधित कार्यकारी अभियंता,मुख्य अभियंता तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तात्काळयाची गंभीर दखल घेऊन रस्त्याची योग्य दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी ठरलेल्या अधिकाऱ्यांवर आणि कंत्राटदार कंपनीवर कायदेशीर कारवाई करणे देखील तितकेच गरजेचे आहे.

मेळघाटाचा सर्वांगीण विकासाच्या नावाखाली दरवर्षी शेकडो कोटी रुपये खर्च होतात. मात्र यानिधीचा वापर योग्य प्रकारे नहोता, तो भ्रष्टाचाराच्या गर्तेतहरवत असल्याचे हे आणखी एक उदाहरण ठरते. त्यामुळे शासनाने आता तरी जागे होऊन, केवळ कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्ष कृतीद्वारे या भागातील रस्ते आणि पायाभूत सुविधा टिकाऊ आणि दर्जेदार कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.-

# व्याघ्र कॉरिडॉरबाबत वन्यजीव मंडळाच्या निर्णयाला आव्हान
## आठ राज्यांतील वन्यजीवांवर वाईट परिणाम होण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नागपूर-** राज्य वन्यजीव मंडळाने विदर्भाकरिता व्याघ्र कॉरिडॉर निर्धारित करण्यासंदर्भात १७ एप्रिल २०२५ रोजी घेतलेल्या एका निर्णयाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. या निर्णयामुळे विदर्भासह मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा, कर्नाटक, ओडिशा, तेलंगाणा व आंध्र प्रदेश येथील वन्यजीवांच्या जीवनमानावर वाईट परिणाम होतील, अशी भीती याचिकाकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

शीतल कोल्हे व उदयन पाटील, अशी याचिकाकर्त्यांची नावे असून, ते पर्यावरणप्रेमी नागरिक आहेत. विदर्भाकरिता व्याघ्र कॉरिडॉर निर्धारित करण्यासाठी राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणचा २०१४ मधील व्याघ्र कॉरिडॉर अहवाल आणि निर्णय समर्थन प्रणाली या दोनच गोष्टी विचारात घेतल्या जातील, असा



### राज्य सरकारला नोटीस

या प्रकरणावर बुधवारी न्यायमूर्तिद्वय नितीन सांबरे व सचिन देशमुख यांच्यासमक्ष सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने वनविभागाचे अतिरिक्त सचिव, प्रधान मुख्य वन संरक्षक, राज्य वन्यजीव मंडळ, राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण व राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांना नोटीस बजावून याचिकेतील आरोपांवर चार आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले.

निर्णय राज्य वन्यजीव मंडळाने १७ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीत घेतला आहे. मंडळाने राष्ट्रीय प्राधिकरणचा व्याघ्र संवर्धन आराखडा आणि ७ फेब्रुवारी २०२३ रोजी जारी निर्देशांकडे दुर्लक्ष केले आहे. मंडळाचा हा निर्णय वन्यजीवांच्या हिताचा नाही, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

# जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून अमरावतीत स्पर्धा
## परीक्षा मार्गदर्शन शिबिर व सत्कार सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती,**अमरावती जिल्ह्यातील जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवेत यावे आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व सक्षम व प्रभावी व्हावे, या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या संकल्पनेतून महत्त्वाचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. यूपीएससी (णझडउ) आणि एमपीएससी (चझडउ) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार आणि स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन मंगळवार, दिनांक १ जुलै रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे करण्यात आले आहे.



या कार्यक्रमात अमरावती शहरातून आयएएस (ख-ड) झालेले तसेच एमपीएससी (चझडउ) परीक्षा उत्तीर्ण झालेले यशस्वी विद्यार्थी उपस्थित राहणार असून, या वेळी त्यांचा विशेष सत्कार आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी श्री. येरेकर तसेच यशस्वी विद्यार्थी स्पर्धा परीक्षा उमेदवारांना त्यांच्या यशाचे रहस्य, अभ्यासाचे तंत्र आणि प्रशासकीय सेवेतील संधींविषयी मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हा प्रशासन अमरावतीच्या वतीने आयोजित हा उपक्रम, प्रशासकीय सेवेत रुजू होऊ इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी व्यासपीठ ठरणार आहे. इच्छुकांनी या मार्गदर्शन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# धारणी तालुक्यातील गावकरी त्रस्तपाच गावे तिन दिवसांपासून अंधारात
## महावितरणच्या हलगर्जीपणाचे विदारक चित्र, पावसात वीजेचा खांब कोसळला, सर्व्हिस लाईन बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७धारणी-** धारणी तालुक्यातील अतीदुर्गम राणीगाव, गोलाई, कंजोली, मोटाखेडा आणि सीनबंद या पाच गावांतील नागरिक गेले तिन दिवसांपासून अंधारात जीवन जगण्यास भाग पडले आहेत. मुसळधार पावसामुळे राणीगावजवळील शेतामध्ये वीज वितरणाचा खांब कोसळल्यानेसर्व्हिस लाईनचे तार तुटले आणि संपूर्ण वीज

### महावितरणचे कर्मचारी गायब

पुरवठा ठप्प झाला. या प्रकारामुळे घरातील पाण्याच्या मोटारी बंद पडल्या, मोबाईल चार्ज होऊ शकत नाहीत, लहान मुलं अंधारात अभ्यास करत आहेत आणि संपूर्ण गाव सम्पूर्ण रात्र अंधारात काढत आहे.

ग्रामीणांनी तक्रार केली आहे की, महावितरणचा एकही कर्मचारी घटनास्थळी आला नाही. वायरमन तर महिन्याला कदाचित दिसतो गंभीर आपत्तीची वेळ येते, तेव्हा जबाबदार अधिकारी मौनव्रत धारण करतात. या प्रकारामुळे पुन्हा एकदासिद्धझाले आहे की, मेलघाट परिसर आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे. केवळ तांत्रिक बिघाड नाही, तर ही प्रशासनाच्या आणि महावितरणच्या निष्क्रीयतेची भयंकर उदाहरण ठरली आहे. ग्रामीणांच्या संयमाचा बांध आता तुटू लागला आहे. सतत




फोन करूनही प्रतिसाद मिळत नाही. अधिकारी केवळ कागदावर योजना दाखवतात. प्रत्यक्षात मात्र अशा अडचणीच्या वेळी गावकऱ्यांना मदतीविना सोडून दिले जाते. तत्काळ खांब दुरुस्त करून वीजपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केलीअसून, महावितरणने गंभीर लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे. या प्रकारातून महावितरणच्या व्यवस्थेतील ढिसाळपणा स्पष्ट झाला आहे. शासनाने आणि संबंधित विभागाने तत्काळ लक्ष घालून अशा ग्रामीण भागांतील मूलभूत गरजांकडे गांभीयार्ने पाहण्याची गरज असल्याचे आदिवासी नागरिकांचे म्हणने आहे.

# कार अपघातात शिवसेनेचे पाच पदाधिकारी जखमी

## उपमुख्यमंत्र्यांच्या ओएसडीच्या भेटीला जाताना अमरावती मार्गावर अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती–** अमरावती मार्गावरीत जवर्दी फाटानजिकच्या मारूती मुलुकी ओना शोरुमजवळ परतवाडा बेचौत ५ शिवसैनिकांचा अपयात झाला. या अपघातात शिवसैनिकांच्या चारचाकी गाडीने रस्त्यावर तीनदा घिरट्या घेतल्या, त्यात त्यांच्या इको स्पोर्ट गाडीची मागील दोन्ही टायर फुटून गाडी एका झाडावर जाऊन आदळली. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे यांची सोमवारी अमरावती येथे बैठक होती. शिवसेना उपजिल्हा प्रमुख तथा वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा अध्यक्ष भूषण नागे, शिवसेना उद्योग क्षेत्रातील जिल्हा अध्यक्ष सुभाष घुटे यांच्यासह शिवसैनिक अरुण खेळकर, सागर डांगे, अमोल वाघ इत्यादी मंगेश



चिवटे यांच्या भेटीसाठी अमरावतीला जात होते. तर अमरावती येथील निवासी आणि चिखलदरा येथे भूमीअभिलेखकार्यालयातील अधिकारी अमोल शेरेकर हे कारने (एमएच २७ बीई १२८६) अमरावतीहून परतवाडधाकडे येत होते. त्यांच्या व शिवसैनिकांच्या कारची धड़क झाली. तत्पूर्वी, शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या कारचे चालक भूषण नागे यांनीही आपल्या दिशेने येत असल्याने आपली गाड़ी नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. मात्र तीन वेळा गाडी पलटी होत रस्त्याच्या कडेला निंबाच्या झाडावर आदळली

त्यात सुभाष घुटे, सागर डांगे,अंकुश वाघ याना मुका मार लागला असून सुभाष घुटे यांना जबर दुखापत झाली आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. जखमी शिवसैनिकांवर शासकीय दवाखान्यात प्रथमोपचार करण्यात आले. चालक भूषण नागे यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी अमोल गरेकर यांच्याविरुद्ध कलम १२० अ, २८१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील कारवाई पोलीस निरीक्षक सुरेश मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत आहे.–

# माझ्या यशात डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे मोठे योगदान

## महाविद्यालयाच्या सत्कार समारंभात सरन्यायाधीश भूषण गवई यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २७अमरावती–** शहरातील डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे माझ्या यशात मोठे योगदान आहे. महाविद्यालयाला अभिमान वाटेल असे कार्य माझ्या हातून घडावे. तसेच देशाची व समाजाची चांगली सेवा या पदावरुन करता यावी. माझ्या आयुष्यात महाविद्यालयाचे महत्त्वाचे स्थान आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात गुरूवारी (दि. २६) रन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्कार समारंभ आयोजित केला होता. याप्रसंगी सत्कारमूर्ती म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, मुख्य अतिथी खासदार बळवंत




वानखडे यांची उपस्थिती होती. या वेळी व्यासपीठावर माजी न्यायाधीश विजय आचलिया, प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांची उपस्थिती होती.

या वेळी बोलताना सरन्यायाधीश भूषण गवई यांनी महाविद्यालयीन जीवनातील अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी विराजमान झाल्यानंतर ज्या महाविद्यालयाने आपल्याला घडविले, त्या महाविद्यालयाला भेट दिली. त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था व डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा सत्कार स्वीकारला. डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयाने दिलेली शिकवण माझ्यासाठी महत्त्वाची आहे. महाविद्यालयात मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच चांगल्या ठिकाणी पोहोचता आले. हे यश सर्वांचे असल्याचे नमूद करून भविष्यात महाविद्यालयाला अभिमान वाटेल, असे कार्य आपल्या हातून घडेल, अशी आशा व्यक्त करत त्यांनी उपस्थितांकडून आशीर्वाद घेतले.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष ड. गजानन फुंडकर, ड.भैय्यासाहेब पाटील (पुसदेकर), कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, हेमंत काळमेघ, प्रा. सुभाष बनसोड, वि. गो. ठाकरे, वकील संघाचे अध्यक्ष ड.सुनील देशमुख, प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य डॉ. अमोल महल्ले, ड. प्रदीप महल्ले, ड. अमर देशमुख, डॉ. अंजली ठाकरे आदींसह विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी केले. संचालन डॉ. राधिका देशमुख व आभार डॉ. प्राची कडू यांनी मानले.

अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी देखील सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कार्याचा गौरव करून श्री शिवाजी शिक्षण संस्थेसाठी हा बहुमान असल्याचे सांगितले.

ज्या माध्यमातून त्यांनी हे मोठे यश संपादन केले, याची जाणीव ठेवून ते वागतात, ही इतरांसाठी आचरणाची बाब असल्याचे हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले. संविधानाचे कार्य भूषण गवई यांच्या माध्यमातून वृद्धिंगत होईल, असा आशावाद व्यक्त केला.

# जिल्ह्यात ५० टक्के पेरण्या आटोपल्या३ लाख ४७ हजार १२२ हेक्टरवर पेरणीसोयाबिन अव्वल

## धामणगाव तालुक्यांत ७७ टक्के पेरण्या पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती –** अमरावती जिल्ह्यात मान्सूनने आगमन केल्यामुळे आता पेरणीला वेग आला आहे. आतापर्यंत ५० टक्के म्हणजे ३ लाख ४७ हजार १२२ हेक्टरवर पेरण्या आटोपल्या आहे. यामध्ये सोयाबिनची सर्वाधिक १ लाख ३१ हजार ४१६ हेक्टरवर तर कापसाची १ लाख २८ हजार ३६१ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे. धामणगाव आणि धारणी तालुक्यांत ७० टक्केच्यावर पेरण्या आटोपल्या आहेत.

राज्यात ७ जून पासून मान्सूनला सुरूवात झाली जिल्ह्यात पावसाच्या प्रतिक्षेत शेतकऱ्यांच्या पेरण्या रखडल्या आहे. गत आठ दिवसांपासून पावसाने आगमन केल्याने शेतकऱ्यांनी आता पेरणीला वेग दिला आहे. परंतु काही तालुक्यात पेरणीची टक्केवारी २५ ते ३५ टक्केच्या आतच आहे. जिल्ह्यात ६ लाख ८२ हजार ९९२ हेक्टर क्षेत्र लागवडीकरिता प्रस्तावित असून यापैकी आतापर्यंत ३ लाख ४७ हजार १२२ क्षेत्रावर पेरण्या आटोपल्या आहे. यामध्ये सोयाबिनची पेरणी १ लाख ३१ हजार ४१६, कापुस १ लाख २८ हजार ३६१ तर तुरीची लागवड ५६ हजार हेक्टरवर करण्यात आली आहे. सद्या जिल्ह्यात पावसाचा जोर वाढल्याने आता या महिन्याअखेरीस पेरणी टक्का वाढण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात धामणगाव रेल्वे तालुक्यात सर्वाधिक ७७ टक्के पेरण्या आटोपल्या आहेत. त्या पाठोपाठ धारणी तालुक्यात ७१ तर तिवसा तालुक्यात ६५ टक्के पेरण्या पुर्ण झाल्या आहेत.

### अशी आहे तालुकानिहाय पेरणीची टक्केवारी

धारणी ७१.७५, चिखलदरा ३३.३१, अमरावती ६१.८४, भातकुली ४४.५९, नांदगाव ५४.४१, चांदूर रेल्वे ४८.९४, तिवसा ६५.७१, मोर्शी २९.३७, वरुड २८.३८, दर्यापुर ४४.३१,४४.३१, अंजनगाव सुर्जी ३५.४३, अचलपूर ६१.१३, चांदूरबाजार ४८.९४, धामणगाव रेल्वे ७७.५४

# खिसे कापणारे अमरावतीतील सराईत चोरटे जळगावात जेरबंद

## ५ लाखांचा मुद्देमाल जप्तस्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७जळगाव–** शहरातील बस स्टॅण्ड मध्ये अमरावती येथील काही खिस्से कापणारे रेकॉर्ड वरील ३ गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी अटक केली. त्यांच्याकडून ५ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई करण्यात आली.अहमद बेग कादर बेग (वय ६२, रा. मुजफ्फरपुरा, नागपुरी गेट पोलीस स्टेशन जवळ, अमरावती), हफिज शाह हबीब शाह (वय ४९, रा. बलगाव सकीनगर, अमरावती) , अजहर हुसैन हफर हुसेन (वय ४९, रा. सुफिया मजिद समोर, रहमत नगर, अमरावती) अशी




संशयितांची नावे आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पोलीस उपनिरीक्षक शरद बागल, अक्रम शेख, नितीन प्रकाश बाविस्कर, प्रविण भालेराव, किशोर पाटील, रविंद्र कापडणे यांच्या पथकाला शहरातील बस स्टॅण्ड परिसरात पेट्रोलींग करण्यासाठी पाठविले. पोलीस अधिकारी व अंमलदार बस स्टॅण्ड परिसरात पेट्रोलींग करीत असताना ३ संशयित गर्दीच्या फायदा घेवून चोरी करण्याच्या प्रयत्नात होते. यावेळी त्यांना ताब्यात घेण्यात आले. यावेळी त्यांनी २४ जूनरोजी जळगाव बस स्टॅण्डमध्ये बस मध्ये चढणाऱ्या एका प्रवाशाच्या खिशातील १०० रुपयांची दोन बंडल चोरल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून ३३ हजार ८३० रुपये रोख, १७ हजार ५०० रुपये किंमतीचे ५ मोबाईल, ०१ रेक्झीन बंग, ५ लाख किंमतीची ०१ टाटा इंडिका व्हिस्टा कार असा एकूण ५ लाख ५१ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जान करण्यात आला. आरोपी अहमद बेग कादर बेग (वय ६२, रा. मुजफ्फरपुरा नागपुरी गेट पोलीस स्टेशन जवळ अमरावती) याच्या विरुध्द अमरावती शहरात विविध पोलीस ठाण्यात ४ गुन्हे दाखल आहेत.

# बैलगाडीसह नाल्यात पडल्याने शेतकरी ठार

## दहेगाव येथील घटना, एक बैल बचावला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७यवतमाळ–** सध्या शेत शिवारात पेरणीचे कामे सुरु आहेत. अशातच शेतात जात असताना बैलगाडी नाल्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. बुधवारी दि. २५ जून रोजी दुपारी तालुक्यातील दहेगाव येथे ही हृदयद्रावक घटना घडली. यात बैलगाडीला बांधून असलेल्या दोनपैकी एक बैल बचावला.

राजू रोकडे (वय ५५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. गावालगत ये-जा करणाऱ्या नागरिकांना नाल्यात एक बैल व बैलगाडी पाण्यात तरंगताना आढळली. त्यांनी ही माहिती गावकऱ्यांना व पोलिसांना दिली. गावकरी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक युवकांच्या मदतीने शोधमोहीम राबवण्यात आली. या दरम्यान, बैलगाडी व त्यास बांधलेला एक बैल मृतावस्थेत आढळून आला. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर शेतकरी राजू रोकडे यांचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला. या घटनेचा तपास ठाणेदार सुखदेव



भोरखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सुनील कुडमथे, धनंजय येसेकर, प्रविण चौधरी, व होमगार्ड यांच्या पथकाने सुरू केला आहे. मृत राजू रोकडे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सून व नातवंड असा परिवार आहे.

पाण्याचा प्रवाह वाढला प्राथमिक अंदाजानुसार रोकडे हे शेतात कामासाठी जात असताना त्यांच्या बैलांना पाणी पिण्यासाठी नाल्यावर नेले गेले असावेत. पाण्याच्या प्रवाहात बैलगाडी अडकल्याने ही दुर्दैवी घटना घडली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. वडकी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी करंजी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला आहे.

# कचरा असलेल्या जागा मालकांना नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती–** एकीकडे शहरातील कचऱ्याचे क्रॉनिक स्पॉट कमी करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्न करीत असतांनाच खासगी जागांवरील कचरा उचलण्याची वेळ आली आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आता जागा मालकांना नोटीस दिली जाणार आहे.



महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने शहरातील कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी क्रॉनिक स्पॉट शोधून काढले. सातत्याने एकाच ठिकाणी कचरा टाकण्यात येणारे असे क्रॉनिक स्पॉट आढळून आले होते.सदर स्पॉट कचरामुक्त करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी प्रयत्न करीत आहेत. यामुळे काही 'स्पॉट' हे कचरामुक्त करण्यात यश आले आहे. कचरा टाकण्यात येणाऱ्या ठिकाणी महानगरपालिकेचे कर्मचारी लक्ष ठेवून जनजागृती करण्यात आली.

दुसरीकडे शहरातील खासगी मोकळ्या जागेत टाकला जाणारा कचरा हा महानगरपालिकेची डोकेदुखी ठरत आहे. यामुळे या खासगी जागेत मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग लागत आहेत. या कचऱ्याला आग लागणे, तो कुजून दुर्गंधी सुटणे, यातून मार्ग काढण्यासाठी आता महानगरपालिकेने संबंधित जागा मालकांना नोटीस देण्याचा निर्णय घेतला आहे. या जागेवर कोणी कचरा टाकू नये यासाठी उपाययोजना करावी, कुंपण घालावे, अशा विविध सूचना जागामालकांना केल्या जाणार असल्याचे महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी सांगितले.

# पावसाचा फटका : नागपूर स्पेशल ७ तर गीतांजली एक्स्प्रेसला ४ तास उशीर

## विलंबाचा प्रवाशांना सोसावा लागला नाहक मनस्ताप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अकोला–** दोन दिवसांपासून पावसाळ्याला जेमतेम सुरुवात झाली आहे. मात्र, मुसळधार पावसापूर्वीच रेल्वेचे वेळापत्रक कोलमडल्याचे चित्र गुरुवारी सकाळी दिसून आले. अकोला रेल्वे स्थानकावरून जाणाऱ्या जवळपास प्रत्येक गाड्या विलंबाने धावत होत्या. यामुळे पावसामध्ये प्रवाशांनाही अडचणीचा सामना करावा लागला. गुरुवारी नागपूर स्पेशल गाडी तब्बल ७ तास विलंबाने स्थानकावर पोहोचली , तर गीतांजली एक्स्प्रेस जवळपास चार तास उशिराने आली.गुरुवारी विविध मार्गावरील नागपूर, तसेच मुंबई मार्गे धावणाऱ्या अनेक गाड्या विलंबाने अकोला येथे पोहोचत होत्या. हे चित्र रात्रीपर्यंत कायम होते. यामुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले. मुसळधार पावसामुळे रेल्वे गाड्या उशिरा धावतात. दरवर्षी पावसाळ्यात हे प्रकार घडतात. मात्र, यंदा पावसाळ्याला जेमतेम प्रारंभ झाला असतानाच रेल्वे गाड्या विलंबाने धावण्याचा प्रकार सुरू झाला आहे. वेगवेगळ्या ठिकाणाहून अकोलामार्गे धावणाऱ्या तब्बल १० रेल्वे गाड्या गुरुवारी लेट झाल्या. यामुळे या गाड्यांनी प्रवास करीत असलेल्या तसेच या गाड्यांनी अकोल्याहून पुढे प्रवास करण्याचे नियोजन करून असलेल्या प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. नागपूर स्पेशल गाडीचा अकोला येथून सुटण्याची वेळ रात्री १.४० मिनीट होता, ही गाडी गुरुवारी सकाळी ५.४७ मिनीटाने पोहचली. १२१९३ नागपूर गरीब रथ सकाळी ४.३० वाजताची गाडी ५.१३ वाजता रेल्वे स्थानकावर आली.

१२१२९ आझाद हिंद सकाळी वेळ ५.२० वाजता आहे. ही गाडी पुण्यातून चार तास विलंबाने सुटली. यामुळे अकोला रेल्वे स्थानकावर आणि पुढे उशिराने धावत होती. याशिवाय २२९७३ पुरी सुपरफास्ट दीड




तास, ११०३९ महाराष्ट्र एक्सप्रेस ४५ मिनीट उशिराने अकोला रेल्वे स्थानकावर पोहचली. नागपूरमार्गे येणाऱ्या सर्व गाड्या सकाळपासून उशिराने धावत होत्या. अकोला रेल्वे स्थानकावर १२८६० गीतांजली एक्स्प्रेस दररोज सकाळी ११.२५ वाजता पोहोचते, ही गाडी दुपारी ३.५० वाजता आली. यामुळे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रचंड मनस्ताप झाला. ०१४६८ पुरी सुपरफास्ट ४ तास, १२८१० हावडा-मुंबई सायंकाळी ६.२५ वाजताची गाडी ९.५ रात्री, २२३५८ मुंबई एलटीटी सायंकाळी ०७.०८ वाजताची गाडी रात्री ९.२२ वाजता, तर १२१३० आझाद हिंद सायंकाळी ७.३७ वाजताची तीन तास विलंबाने धावत होती.

# सहा बीडीओंच्या बदल्या, परंतु सीईओ न सोडण्यावर ठाम, नवा अधिकारी येईपर्यंत पदमुक्ती नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

जिल्ह्यातील सहा गटविकास अधिकाऱ्यांच्या (बीडीओ) एकाचवेळी बदल्या करण्यात आल्या आहेत. परंतु जि. प.च्या सीईओ संजीता महापात्र यांनी जोपर्यंत नवा अधिकारी अमरावतीत दाखल होणार नाही, तोपर्यंत संबंधितांना पदमुक्त केले जाणार नाही, अशी भूमिका घेतली आहे.




जिल्ह्यातील १४ पैकी काही पंचायत समित्यांमध्ये अजूनही पूर्णवेळ बीडीओ नाहीत. अशा स्थितीत इतर अधिकाऱ्यांना पदमुक्त करणे, हे सोयीचे होणार नाही. त्यामुळे सीईओ आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार वरुडचे बीडीओ सतीश देशमुख यांची बुलडाणा जिल्हा परिषदेत उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी (पाणी व स्वच्छता मिशन) बदली झाली आहे. तर अंजनगाव सुर्जी येथील बीडीओ श्रीकिसन खातळे यांची नाशिक जिल्ह्यातील नांदगाव पंचायत समितीचे बीडीओ म्हणून बदली झाली आहे. त्याचवेळी चिखलदरा पं. स.चे बीडीओ शिवशंकर भारसाकळे यांची बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा पं. स. बीडीओ म्हणून बदली केली आहे.

मोर्शी येथील बीडीओ उज्वला ढोले यांची बदली यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव पं. स. बीडीओपदी केली आहे. तर चांदूर बाजार येथील बीडीओचे पद गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त आहे. दर्यापूरचे बीडीओ म्हणून कालिदास तापी हे प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. परंतु शासनाने त्यांचीही बदली वाशीम जिल्ह्यातील मंगरूळपीर येथे केली आहे. अशाप्रकारे एकाचवेळी सहा पंचायत समित्यांचे कामकाज अडचणीत येणार आहे. त्यामुळे बदलीच्या ठिकाणी नवे अधिकारी आल्याशिवाय या अधिकाऱ्यांना जाऊ द्यायचे नाही, अशी जि. प. प्रशासनाची भूमिका आहे. दरम्यान वरुडचे बीडीओ सतीश देशमुख यांना पदमुक्त करण्यात आले असून, ते बुलडाणा जिल्हा परिषदेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. हे पद गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त होते. दरम्यान देशमुख यांच्या रिक्त जागेचा तात्पुरता पदभार तेथील सहायक बीडीओ खुशाल पिल्लारे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. देशमुख यांच्या काळात कर्मचाऱ्यांमध्ये बऱ्याच कुरबुरी निर्माण झाल्या होत्या, हे विशेष.



जिल्ह्यात आधीच मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे आहे त्या अधिकाऱ्यांनाही पदमुक्त केले, तर कामे कशी करायची, असा प्रश्न निर्माण होतो. ही बाब थेट सचिवांच्याही लक्षात आणून दिली. तोकड्या मनुष्यबळावर जनतेला सेवा देणे शक्य नाही. त्यामुळे जोपर्यंत नवे अधिकारी अमरावतीत दाखल होत नाहीत, तोपर्यंत या अधिकाऱ्यांना सोडणे शक्य नाही.

**–संजीता महापात्र, सीईओ**

# दत्तापुर मुख्य रस्त्यावरील कॉटन चौकात पुलाला भगदाड

## अपघात होण्याची भीती:न.प.च्या बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये संताप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७धा.रेल्वे**

कॉटन मार्केट चौकातील नगरपरिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या दत्तापुर रस्त्यावरील पुलाला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे वाहनधारकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. विद्यार्थी आणि नागरिकांची या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या रस्त्याच्या दुरुस्तीकडे नगरपरिषद बांधकाम विभागाने दुर्लक्ष आहे. त्याबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वेळीच दुरुस्ती न केल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे. दत्तापूर विभागातील कॉटन मार्केट चौकातील नगरपरिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित हा रस्ता येतो. विद्यार्थीवर्गासह ग्रामस्थांना शहरात येण्यासाठी सोयीचा आणि जवळचा हा मार्ग आहे. रस्त्यावरील पुलावर मोठे भगदाड पडल्याने रस्ता वाहतुकीस धोकादायक झाला आहे. रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डा पडल्याने वाहनधारकांना हा धोकदायक खड्डा दिसत नाही, मात्र जवळ आल्यावर अचानकपणे दिसते. त्यामुळे वाहनचालकांची चांगलीच त्रेधातिरपीट उडते. नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाने तत्काळ हा रस्ता दुरूस्त करावा,अशी मागणी वाहनधारकांसह नागरिकांतून होत आहे.

कॉटन मार्केट चौकातीलच दुभाजकाला लागून असलेल्या डांबरी रस्त्यावरही मोठा खड्डा पडला आहे. हा खड्डा अपघाताला आमंत्रण देत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या मार्गावर वाहनधारकांना जीव मुठीत घेऊनच वाहने चालवावी लागत आहेत. या परिसरात तहसील कार्यालय, पंचायत समिती, भूमी अभिलेख कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती असल्याने मोठी वर्दळ असते, त्यामुळे दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### तातडीने दुरुस्ती करावी

पुलावर खूप मोठे भगदाड पडल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याची नगर परिषदेच्या बांधकाम विभागाने युद्धपातळीवर दुरुस्ती करावी.

**नवीन कनोजिया ,**
**माजी नगराध्यक्ष**
**धामणगाव रेल्वे.**

# वरूड तालुक्यातून डीएपी खत गायब : शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७वरुड**

कृषी निविष्ठा केंद्रातून डीएपी खत गायब झाल्याने शेतकऱ्यांमध्ये दुकाने फिरण्याची वेळ आली तरीही उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांची परवड होत आहे

खरीप सिझनाची पेरणीचा हंगाम सुरुवात झाल्याने यंदा सर्वात वरुड तालुक्यात एकाएकी सोयाबीन, तुरीचा पेरा जास्त वाढला आहे. सोयाबीन पेरतेवेळी डीएपी स्वस्त असल्याने शेतकरी डीएपी खताला पसंती दर्शवितात. म्हणून डीएपी या रासायनिक खताची सर्वात जास्त मागणी असते.मात्र कृषी सेवा केंद्रचालक डीएपी उपलब्ध नसल्याचे सांगत शेतकऱ्याना आल्या पावली परत जावे लागत असल्याने शेतकरीपावसाळा लांबल्याने पेरणी उशिरा होत आहे.सध्या बोगस बियाणे, खत कीटकनाशकांच्या आणि विक्रीमुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक सुरू आहे. अशा परिस्थितीत कृषी विभागाने गुणवत्ता नियंत्रण विभागातील तपासणी करणाऱ्या निरीक्षकांचे अधिकार काढले आहेत. शासनाने २० जून रोजी या मार्गदर्शक सूचना जारी करून शेतकऱ्यांच्या हिताविरोधात आणि बियाणे कंपन्यांच्या फायद्यासाठी निर्णय घेतल्याची टीका होत आहे. या निर्णयामुळे बोगस बियाणे, खत, कीटकनाशक विक्री अनियंत्रित होऊन शेतकऱ्यांची फसवणूक वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

# शहरात आजपासून जगन्नाथ रथयात्रा महोत्सव

## शोभायात्रेसह भगवान जगन्नाथ येणार आचार्य निवासात; आषाढी एकादशीला येणार परत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शहरात भगवान जगन्नाथ यांचा रथयात्रा महोत्सव शुक्रवार, २७ जून ते ६ जुलै या कालावधीत साजरा केला जाणार आहे. यंदाही जगदिश्वर संस्थानाद्वारे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाला शोभायात्रेद्वारे सुरुवात होणार आहे. भगवान जगन्नाथ त्यांच्या भक्तांसह आचार्य निवासात पोहोचतील. तेथे १० दिवस विश्रांती घेऊन आषाढी एकादशीला ६ जुलै रोजी मंदिरात परत येतील.



रंगारी गल्ली येथील जगदिश्वर संस्थानातून शुक्रवारी दुपारी ४ वाजता रथातून भगवान जगन्नाथ थोरले बंधू बलभद्र व धाकटी बहीण सुभद्रासह धनराज लेन, सक्करसाथ चौक, जवाहर गेट मार्ग, सरोज चौक मार्गाने जयस्तंभ चौक, मालविय चौकापर्यंत येतील. येथे आचार्य निवासस्थानी येतील. त्याचप्रमाणे ६ जुलै रोजी दु. ४ वाजता भगवान जगन्नाथ आचार्य निवास येथून रंगारी गल्लीतील जगदिश्वर मंदिराकडे प्रस्थान करतील. ही रथयात्रा जयस्तंभ चौक, राजकमल चौक, अंबागेट, दहीसाथ, भाजीबाजार, सक्करसाथ मार्गे जगदिश मंदिर, रंगारी गल्ली येथे पोहोचेल. येथे रथयात्रेचा समारोप होईल. रथयात्रेत सहभागी होऊन भाविकांनी जगन्नाथाचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन आयोजकांद्वारे करण्यात आले आहे. २७ जून रोजीच जगन्नाथ पुरी येथील प्रसिद्ध रथयात्रा आयोजित केली जाते.

बलभद्र यांच्या रथाला तालध्वज, देवी सुभद्रा यांच्या रथाला दर्पदलन व भगवान जगन्नाथ यांच्या रथाला नंदीघोष असे नाव आहे. तिन्ही रथांचे नाव जसे वेगळे आहे तसेच या तिन्ही रथांना खेचणाऱ्या मोठ्या दोरखंडांनाही नाव देण्यात आले आहे. भगवान जगन्नाथ यांच्या रथाच्या दोरखंडाला शंखचुडा नाडी, बलभद्र यांच्या रथाच्या दोरखंडाला वासुकी आणि देवी सुभद्रा यांच्या रथाच्या दोरखंडाला स्वर्णचुडा नाडी असे म्हणतात. भाविक हे तिन्ही रथ दोरखंडांद्वारे खेचतात. यामुळे भाविकांना पुण्य लाभ होतो, अशी मान्यता आहे. शहरात दरवर्षी ही रथयात्रा काढली जाते. या रथयात्रेत एकाच रथात भगवान जगन्नाथ, बलभद्र व देवी सुभद्रा विराजमान असतात. वेगवेगळे रथ वापरले जात नाहीत. शहरात शिस्तीत तसेच भक्तिभावात रथयात्रेचे आयोजन केले जाते. रथाला बांधलेला दोरखंड भाविक खेचतात. त्यानुसार रथ पुढे सरकतो. शहरातील विविध चौकांमध्ये फुलांचा वर्षाव करून रथयात्रेचे स्वागत केले जाणार आहे. त्याचप्रमाणे भाविकांना प्रसाद व नाश्ताही वितरित केला जाणार आहे. दुपारी रंगारी गल्लीतून निघालेली रथयात्रा रात्री मालविय चौकात पोहोचते.

# धारणीत कोम्बिंग ऑपरेशन; सतरा आरोपींना अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ धारणी**

पोलिस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेले ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांनी सूत्र हातात घेता बरोबरच कोम्बिंग ऑपरेशन राबविले. यामध्ये विविध वॉरंटमधील १७ आरोपींना ताब्यात घेण्यात आले.धारणी शहर व ग्रामीण भागातील वारंटमधील आरोपी फरार असताना त्यांना पकडण्याकरिता नोटीस जारी करण्यात आली होती. या नोटीसवरून धारणी पोलिसांनी या वारंटमधील आरोपींना पकडण्याकरिता मोहीम राबविली होती. या मोहिमेदरम्यान १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांना जिल्हा सत्र न्यायालय अचलपूर रवाना करण्यात आले आहे. या कारवाईत ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक सतीश झालटे, एएसआय माधव जांबु, पो. हे. कॉ. बेलसरे, पो. हे. कॉ. पाठक पो. हे. कॉ. शेख गणी, पो.कॉ. जगत तेलगोटे,. पो. कॉ. सुमित, पो. कॉ. भावना, पो. कॉ. मोहित आगाशे यांचा सहभाग होता.

# माहुली चोर ते सावनेर-जामगाव रस्त्याची अवस्था झाली बिकट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माहुली चोर ते सावनेर, जामगाव दरम्यानचा रस्ता अतिशय खराब झाला आहे. या रस्त्याने ये-जा करणे कठीण झाले आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांनी या भागाचे आमदार प्रताप अडसड यांना साकडे घातले असून, हा रस्ता तातडीने वाहतूक योग्य करावा, अशी मागणी केली आहे. या मागणीची तत्काळ दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास ग्रामस्थांकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.



रस्ता खराब असल्यामुळे नागरिकांना रोजच्या जीवनात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्याचे डांबरीकरण फार पूर्वी करण्यात आले होते. मात्र त्यानंतर त्याची कोणतीही देखभाल अथवा दुरुस्ती करण्यात आलेली नाही. परिणामी सद्य:स्थितीत हा रस्ता पूर्णपणे उखडलेला असून, त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. माहुली चोर हे गाव नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील एक प्रमुख गाव आहे. हे गाव अमरावती-यवतमाळ मुख्य मार्गालगत असून येथे आठवडी बाजार, दवाखाने, औषधीची दुकाने, रोजच्या व्यवहारातील तसेच जीवनावश्यक वस्तूंची प्रतिष्ठाने आहेत. त्यामुळे आसपासच्या खेड्यांतील नागरिकांची येथे सातत्याने ये-जा सुरू असते. त्यामध्ये सावनेर व जामगाव येथील नागरिकांची संख्या सर्वाधिक असून या दोन्ही गावांना माहुली चोरशी जोडणारा हा प्रमुख संपर्क मार्ग आहे. सध्या या रस्त्याची स्थिती अत्यंत वाईट झाली असून वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, पावसाळ्याच्या तोंडावर ही स्थिती अधिकच बिकट झाली आहे. परिणामी अपघाताचा धोका वाढला असून रुग्णवाहिका आणि शालेय वाहनांनाही या मार्गाने येणे-जाणे कठीण झाले आहे.

# पोलिस दलात नोकरीचे आमिष; तरुणाकडून उकळले २ लाख : तिवसा पोलिसांनी केली तोतया पोलिसाला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नांदगाव पेठ**

पोलिस असल्यानी बतावणी करून एका तरुणाला पोलिसांत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत दोन लाखांनी गंडा घालण्यात आला. हा प्रकार तिवसा ठाण्याच्या हद्दीतील गुरुदेवनगर, मोझरी येथे २५ जूनला घडला. रक्कम घेतल्यानंतर तू झेरॉक्स काढ, तोपर्यंत मी एसपी साहेबांना भेटून येतो, अशी थाप देऊन हा तोतया तेथून पसार झाला. मात्र, तिवसा पोलिसांनी त्याला तत्काळ अटक केली.

विनायक काशीनाथ बोरकर (६०, रा. ता. मूल, जि. चंद्रपूर) असे अटक केलेल्या तोतयाचे नाव आहे. याप्रकरणी संकल्प संजय राणे (१९, रा. मेहगाव, ता. तुमसर, जि. भंडारा) याने तक्रार दिली आहे. संकल्पच्या नातेवाइकाची एका त्रयस्थ व्यक्तीच्या माध्यमातून विनायक बोरकरसोबत ओळख झाली. माझी पोलिस दलातील मोठ्या अधिकाऱ्यांसोबत ओळख आहे. संकल्पला पोलिस खात्यात नोकरी देऊ शकतो, मात्र त्यासाठी दोन लाख रुपये लागतील, अशी बतावणी त्याने संकल्पच्या नातेवाइकांकडे केली. त्याने रक्कम घेऊन संकल्पला मोझरी येथे बोलावले. त्यानुसार, संकल्प हा त्याच्या नातेवाइकांसह २५ जून रोजी मोझरी गुरुदेवनगर येथे पोहोचला. विनायक बोरकरसुद्धा मोझरीत आला.



त्याने संकल्पकडील दोन लाख रुपये व मूळ कागदपत्रे घेतली.

झेरॉक्स प्रती काढून ठेवा, तोपर्यंत मी एसपी साहेबांना भेटून येतो, अशी थाप देत तो पळाला. याप्रकरणी तिवसा पोलिसांनी तक्रारीवरून तोतयेगिरीचा गुन्हा दाखल केला. ही कारवाई ठाणेदार प्रदीप शिरस्कार यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक अमोल मुडे व त्यांच्या पथकाने केली आहे. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

### आरोपीकडे पोलिस बेल्ट सापडला; कोठडीत रवानगी

आरोपीला अटक केली असून एक दिवसांची पोलिस कोठडी मिळाली आहे. त्याच्याविरुद्ध चंद्रपूर जिल्ह्यात अशाचप्रकारे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर येत आहे. त्याच्याजवळ पोलिस युनिफॉर्मवरील बेल्टही मिळाला आहे.

**अमोल मुडे, एपीआय, तिवसा.**

# निधीअभावी टाकरखेडा संभूतील जलजीवन मिशनचे काम रखडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७टाकरखेडा संभू**

टाकरखेडा संभू येथे जल जीवन मिशन अंतर्गत तब्बल ५० हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यात आली असली तरी, एक वर्ष उलटूनही गावकऱ्यांना अद्याप पाण्याचा थेंबही मिळालेला नाही. योजनेची पाइपलाइन जोडणी अपूर्ण असल्याने ही टाकी सध्या शोभेची वास्तू ठरत आहे.ही योजना १०५ गाव पाणीपुरवठा योजनेचा भाग असून, विस्रोळी धरणातून रामा गावमार्गे पाणीपुरवठा होणे अपेक्षित आहे. मात्र, निधीअभावी काम रखडल्याचे चित्र आहे. यामुळे महिलांना अजूनही पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी या समस्येकडे वेळोवेळी प्रशासन, लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार यांचे लक्ष वेधले. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे आता पाइपलाइन जोडणी दोन महिन्यांत पूर्ण न झाल्यास ग्रामस्थांसह बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा शेंडे यांनी दिला आहे.सरकारच्या 'हर घर जल' योजनेद्वारे दाखवलेले स्वप्न सध्या तरी अपूर्णच असल्याचा संताप ग्रामस्थांनी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला.

# दीड लाख शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास नकार

## कर्ज वितरणात नेहमीप्रमाणे राष्ट्रीय व खासगी बँकांनी हात आखडता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

यंदाच्या खरीप हंगामात अमरावती जिल्ह्यातील तब्बल दीड लाख शेतकरी पीककर्जापासून वंचित आहेत. एक एप्रिलपासून प्रारंभ झालेल्या कर्जवाटप प्रक्रियेत आतापर्यंत निर्धारित लक्ष्यांकाच्या तुलनेत साठ टक्के वितरण झाले आहे. ७३ हजार ६३३ शेतकऱ्यांना कर्ज प्राप्त झाले आहे. कर्ज वितरणात नेहमीप्रमाणे राष्ट्रीय व खासगी बँकांनी हात आखडता ठेवला आहे.



अमरावती जिल्ह्यासाठी या खरीप हंगामात १६५० कोटी रुपये पीककर्जाचा लक्ष्यांक मंजूर करण्यात आला आहे. राष्ट्रीय, सार्वजनिक, ग्रामीण व जिल्हा मध्यवर्ती बँक मिळून एकूण २.२५ लाख शेतकऱ्यांना कर्ज विरतणाची मर्यादा निश्चित करण्यात आली. एक एप्रिलपासून खरिपाच्या कर्ज वितरणास प्रारंभ करण्यात आला.आतापर्यंत राष्ट्रीय बँकेने ८७ हजार १०० सभासदांपैकी केवळ २५ हजार ५७७ सभासदांना तर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी १० हजार ४०० पैकी ८९५ सभासदांना कर्जासाठी पात्र ठरवत वितरण केले आहे. ग्रामीण बँकेचे २५०० सभासद असून त्यांनी ७७४ सभासदांना कर्ज दिले आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मात्र आघाडी घेत ४६ हजार ३८७ सभासदांना कर्ज वाटप केले आहे. या बँकेचे सव्वालाख सभासद आहेत.यावर्षी पीककर्जाची मर्यादा तीन लाखांवरून पाच लाख करण्यात आली आहे. बँक कर्ज वितरण करताना पीकनिहाय कर्ज देत असून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करीत आहेत. या शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.


### बँकांनी केलेले कर्ज वितरण

खरीप हंगाम २०२५-२६ साठी १६५० कोटींचे लक्ष्यांक निर्धारित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील २ लाख २५ हजार सभासदांना हे कर्ज वितरित करायचे आहे. एक एप्रिलपासून १५ जूनपर्यंत ७३ हजार ६३३ सभासदांना ९८७.७६ कोटी रुपये कर्ज वितरित करण्यात आले आहे. कर्ज वितरणाचे प्रमाण साठ टक्के आहे.

# भाजपच्या माजी पदाधिकारी व माजी नगरसेवकाकडून आमदार प्रवीण तायडेंच्या संगणक चालकावर जीवघेणा हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ चांदुर बाजार**

चांदूर बाजार नानोरी मार्गावरील गजानन लेआउट येथील रात्रीच्या अंधारात भारतीय जनता पार्टीचे अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या जनसंपर्क कार्यलयात कार्यरत संगणक चालक प्रज्वल डवरे या युवकाच्या डोक्यावर भाजपच्यास माजी पदधिकाऱ्यांनी स्टील च्या रॉडने हल्ला करत गंभीर दुखापत केल्याची घटना रात्रीच्या अंधारात घडली जखमी युवक प्रज्वल डवरे चांदूर बाजार शहारातून कार्यलय बंद करून त्याच्या गावी जात असतांना आरोपी भाजपा माजी मंडळ अध्यक्ष मुरली माकोडे व माजी नगरसेवक विशाल तायवाडे प्रजवलला भेटले व जखमी युवकाला म्हणाले की तुझे जे बयाण आहे ते आमचे मताने दे आरोपी विरुध्द कोटीत बोलू नको जखमी प्रज्वलने म्हटले की मी माझे मताने बयान देतो असे म्हटल्यावर आरोपी मुरली व विशाल ने षिविगाळ केली व आरोपी मुरली माकोडे याने कुषीत भुक्या मारल्या व आरोपी विशाल तायवाडे याने त्याचे जवळ असलेले स्टिल चे घातक चायना रॉड ने प्रज्वलच्या डाव्या बाजूला डोक्याला गंभीर दुखापत करून जखमी केले त्यामुळे प्रज्वल च्या डोक्यातून रक्त निघाले व यानंतर तु बयान दिले तर तुला जिवाने मारुन टाकणार अशी धमकी देऊन आरोपी फरार झाले जखमी प्रज्वल याला गंभीर दुखापत झाल्याने तो जागीच बेशुद्ध पडल्याची माहिती स्थानिकांना मिळाली त्यानंतर त्याला चांदूर बाजार उपजिल्हा रुंगणालय येथे दाखल करण्यात आले वैधकीय अधिकाऱ्यांनी रक्तस्त्राव वाढल्याने प्रज्वल च्या डोक्याला ७ टाके लावले त्यानंतर त्याला अमरावती जिल्हा सामान्य रुंगणालाय येथे हलविण्यात आले आरोपी माजी मंडळ अध्यक्ष मुरली माकोडे व आरोपी विशाल तायवाडे याच्यावर कलम ११८ (१),३५१ (२),(३), ३५२,३(५) बी एन एस (कलम ३२४,५०६, ५०४,३४ भादवी) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.



# येवद्याच्या प्रस्तावित ग्रामीण रुग्णालयाचे अंदाजपत्रके, आराखडे सादर करा

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश: खा.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नांना यश, निधी मंजुरीचा मार्ग मोकळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील प्रस्तावित ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामाचे अंदाजपत्रके, आराखडा, इन्फ्रास्ट्रक्चर निर्मितीसाठी आवश्यक असलेले नियोजन तातडीने सादर करा, असे निर्देश महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आरोग्य विभागाला दिले आहे. ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे भव्य आणि प्रशस्त निर्माण युद्धस्तरावर व्हावे यासाठी प्रारंभी पासूनच खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्याला या निमित्ताने यश आले आहे.



येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन व्हावे, अशी मागणी प्रारंभीपासूनच भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य नकुल सोनटक्के यांनी खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे रेटून धरली होती. त्यानुसार अलीकडेच शासनाकडून ग्रामीण रुग्णालयाला मंजुरी देण्यात आली आहे. तीस खटांचे अद्यावत रुग्णालय येवदा येथे साकारणार आहे. रुग्णालय मंजूर झाल्यानंतर निधी उपलब्ध न झाल्याने प्रशासकीय पातळीवर सदर कामकाज खोळंबले होते. ही बाब लक्षात घेता येवद्याच्या ग्रामीण रुग्णालयासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली होती. या संदर्भात आवश्यक असलेले शासन निर्णय, प्रशासकीय कार्यवाही, विविध विभागांकडून आवश्यक असलेल्या मंजुरी याबाबतचे संपूर्ण माहिती नकुल सोनटक्के यांनी खासदार डॉ. अनिल बोंडे यांना देत येवदा भागात प्रशस्त आरोग्यसेवा विकसित करण्याची मागणी केली होती. त्यानंतर शासनाकडून भरघोस निधी देखील ग्रामीण रुग्णालयासाठी मंजूर करण्यात आला. त्यानंतर आता पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येवद्याच्या ग्रामीण रुग्णालयाचे अंदाजपत्रक, आराखडे सादर करण्याच्या सूचना आरोग्य विभागाला दिल्या आहेत. त्यामुळे लवकरच येवदा ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीच्या पायाभरणीला सुरुवात होणार आहे.

# विठ्ठल रुक्मिणीचे २४ तास दर्शन; प्रक्षाळ पूजेपर्यंत मंदिर राहणार खुले

## आषाढी निमित्ताने भाविकांची होणार सोय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७पंढरपूर**

आषाढी यात्रा आठ दिवसांवर आहे. या अनुषंगाने भाविक पंढपुरात दाखल होऊ लागले आहेत. तर पुढील दिवसात गर्दी अधिक वाढणार असून या काळात भाविकांना तात्काळ दर्शनाचा लाभ मिळावा; यासाठी आजपासून विठ्ठल रुक्मिणी मातेचे २४ तास दर्शन सुरू करण्यात आले आहे. पुढील वीस दिवस म्हणजे १६ जुलैपर्यंत मंदिर २४ तास खुले राहणार आहे.

वर्षातून एकदा येणाऱ्या आषाढी वारीची वारकरी आतुरतेने वाट पाहत असतात. सावळ्या विठुरायाच्या दर्शनासाठी वारकरी, भाविक पंढरीत येऊन दर्शनाचा लाभ घेत असतात. आता दहा दिवसांवर आषाढी एकादशी असून विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागू लागल्या आहे. त्या दृष्टीने विठ्ठल मंदिर समितीचे नियोजन देखील झाले आहे. विठ्ठल भक्ताला चांगले दर्शन घेता यावे; अशी व्यवस्था करण्यात आली असून मंदिर आता २४ तास सुरु ठवण्यात येणार आहे.

आज सकाळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या उपस्थितीत देवाचा पलंग काढण्यात आला. त्यानंतर देवाला लोड देण्यात आला. आज पाहिजे विठुरायाचे विधीवत पूजा केल्यानंतर भाविकांसाठी २४ तास दर्शन सुरू झाले. यावेळी विठोबाचे नवरात्र बसते असे ही मानले जाते. या काळात नित्योपचार वगळता विठोबाचे सर्व राजोपचार बंद ठेवले जातात. यामुळे भाविकांना दर्शन घेणे सोयीचे होत असते.

### १६ जुलैपर्यंत मंदिर खुले

आषाढी वारीच्या अगोदर भाविकांची गर्दी वाढतच असते. तर आषाढी एकादशीच्या दिवशी १० ते १२ लाख भाविक पंढरपुरात दाखल होत असतात. इतकेच नाही तर आषाढी नंतर देखील दहा- बारा दिवस भाविकांची गर्दी कायम असते. यामुळे आषाढी नंतरच्या १६ जुलै रोजी होणाऱ्या प्रक्षाळ पूजेपर्यंत २४ तास दर्शन सुरू असणार आहे.

# आयसीएआय अमरावती शाखेच्या एमएसएमई महोत्सवाचे आ.संजय खोडके यांच्या हस्ते थाटात उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शहराच्या वाढत्या विस्ताराबरोबच औद्योगिक क्षेत्र सुद्धा वाढत चालले आहे. देशातील नामांकित उद्योग समूह सुद्धा अमरावतीमध्ये गुंतवणुकीसाठी तयार असून त्यांना सर्वप्रकारच्या भौतिक सुविधा व कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सकारात्मक पाऊले उचलली आहे. या आस्थापनांना आर्थिक सल्लामसलत यासह वित्तीय सेवा प्रदान करण्यासाठी सनदी लेखापालांचे महत्व अधोरेखित झाले आहे. या क्षेत्राचा विकास करण्यासाठी नवकल्पना, संशोधन व नाविन्यपूर्ण प्रशिक्षणाच्या संधी निर्माण करण्यासाठी आपले प्रयत्न राहणार असल्याचे प्रतिपादन आ.संजय खोडके यांनी केले.



दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटट ऑफ इंडिया अमरावती शाखेच्या वतीने आज दिनांक शुक्रवार दिनांक २७ जुन २०२५ रोजी सातुर्णा स्थित सीए भवन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम दिना निमित्य आयोजित एमएसएमई महोत्सवाच्या उदघाटनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आयसीएआय अमरावतीचे अध्यक्ष - सीए दिव्या त्रिकोटी, महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मंडळाचे प्रादेशिक अधिकारी राम लंके ,चेंबर ऑफ एमएसएमईचे चेअरमन ज्ञानचंद्र मिश्रा, सीए- अर्पित काबरा तसेच आयसीएआय अमरावतीचे उपाध्यक्ष- सीए हर्ष शर्मा, सचिव - सीए संदीप सुराना, सीए -आदित्य खंडेलवाल, सीए -अभय साहू, सीए - ललित तांबी, तसेच आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवर अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन करून एमएसएमई महोत्सवाचे उदघाटन करण्यात आले.

पुढे बोलतांना आ. संजय खोडके म्हणाले कि, लघु व मध्यम उद्योजकांना गुंतवणुकीसाठी उत्पादन व सेवा प्रदान करण्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे आज उद्योजकता विकास साधण्यात आला असून आगामी काळाची गरज लक्षात घेता या क्षेत्रात नव्या संधी व सुविधा निर्माण करण्याच्या दिशेने सुद्धा पाऊले उचलली जात आहे. आज एमआयडीसी असो किंवा जिल्हा उद्योग केंद्र असो ,किंवा अन्य कुठले उद्योग समूह यांच्या समन्वयातून नवे उद्योजक घडविले जात असतांना त्यांना आर्थिक व्यवस्थापन, लेखापरीक्षण व कर आकारणी पासून ते आर्थिक सल्लामसलत व वित्तीय सेवा देण्यासाठी सनदी लेखापाल हे एक व्यावसायिक पद सर्व आस्थापनांमध्ये निर्माण करणे महत्वाचे आहे. अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात लवकरच सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इक्यूबेशन अँड ट्रेनिंग या कौशल्यवर्धन केंद्राची उभारणी होत आहे. या केंद्रामध्ये सनदी लेखापाल होऊ प्रशिक्षणार्थींना इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्याचा मानस सुद्धा आ. संजय खोडके यांनी व्यक्त केला.या प्रसंगी सर्व सीए संजय लाखोटिया , गिरीश चांडक, राजेश चांडक, दामोदर खंडेलवाल,राजेंद्र खंडेलवाल, विनोद तांबी, विष्णूकांत सोनी, पवन जाजू , गोपाल सोमाणी, तसेच दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटट ऑफ इंडिया अमरावती शाखेच्या पदाधिकारी व सदस्य , एमआयडीसी, जिल्हा उद्योग केंद्र, वित्तीय संस्था, तसेच नामांकित उद्योग समूहाचे प्रतिनिधी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीप्ती राठी यांनी केले.

# श्री क्षेत्र कौंडण्यपुर मध्ये २११ मीटरची अखंड साडी चोळी अर्पण सोहळा!

अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते विदर्भाची पंढरी असलेल्या व माता रुख्मिनी चे माहेर असलेल्या श्री क्षेत्र कौडण्यपूरच्या माता रुक्मिणीला वर्धा नदी पात्रात बोटिंग द्वारे २११ मीटरची अखंड साडी चोळी अर्पण केली. साडी चोळी कार्यक्रमा बरोबरच तिरंगा यात्रेचेही आयोजन करण्यात आले होते अंबा रुख्मिणी संस्कृतीक महोत्सव समितीच्या वतीने हे आयोजन करण्यात आले होते. हजारो वारकऱ्यांच्यादिंडीत हरिभजनात चंद्रशेखर बावनकुळे यांचे जोरदार स्वागत यावेळी करण्यात आले. या सोहळ्यात आमदार प्रताप अडसड,आ.राजेश वानखडे,आ.दादाराव केचे उपस्थित होते. तर भाजप जिल्हाध्यक्ष ग्रामीण रविराज देशमुख ह्यांच्या अध्यक्ष ते मध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

